

# म ना पा सू न
# म ना प र्यं त......

( वर्ष पहिले, अंक पहिला )

www.gdmanapasunmanaparyant.blogspot.in

# संपादकीय लेखणीतून ....

© विपुल वर्धे

मनापासून मनापर्यंत

संपादक असल्यामुळे संपादकीय लिहावं लागलंच.... संपादकीय लिहिण्याची ही पहिलीच वेळ असल्यामुळे आणि तशी कधी गरज हि न पडल्यामुळे या बद्दल काही माहितीच नव्हतं....मनापासून मनापर्यंतच्या पहिल्या अंकानिमित्त का होईना, अनेक संपादकीय लेख वाचनात आले... या अंकामुळे मी अनेक पुस्तकांतील, वर्तमानपत्रातील, वेगवेगळ्या मासिकांतील; इतकेच नव्हे तर काही दिवाळी अंकातील संपादकीय सुद्धा चाळुन बघितले....

मी जेमतेम वयाच्या 19 व्या वर्षी ओठातले शब्द वहिच्या पानावर उतरवण्यास सुरुवात केली , म्हणजे कविता करण्याची सुरुवात झाली.

तसा मी बि.एससी. मॅथ्स चा विद्यार्थी असल्यामुळे साहित्याशी काही संपर्कच नव्हता , पण वाचनाची आवड असल्यामळे ,

"शब्दाची सांगळ
जुळवण्याचा प्रयत्न केला ,
अखेर कवितेचे कोडे उलथे पडले
आणि
मनातिल भावनांचे वारे
सैरा वैरा पडत सुटले ."

गणिते करता करता कविता कशा सुचल्या हे तर कळेनासे झाले .......

कवितेची लागलेली नशा पाहुन मॅगझिन चा विचार विशाल च्या डोळ्यासमोर येउन माझ्या हृदयात बसला.......

कारण........

" बेभान मनाला लागलेलं, वेड
हे कवितेच्या प्रेमात हरपुन गेलं,
वहिमधलं, पान कोरुन
इंटरनेटच्या जगामध्ये आलं."........

ह्या अंकाबद्दल सांगायचं झालं तर हा अंक
फक्त मनातिल भावना,
ओठांवरील शब्द इतकाच आहे.

मनापासून मनापर्यंत..... आमच्या अंकाचं शिर्षक.....! अंकाबद्दल बोलायचं झालं तर, या अंकात.सर्वकाही मनापासूनच आहे; फक्त ते आपल्या मनापर्यंत.पोहोचविले इतकेच.....

नविन काहि करायचं म्हंटलं, तर.अडचणी निर्माण होतातच..... तश्या आमच्या कामातही त्या फरकटत होत्याच..... पुरेसं भांडवल नसल्यामुळे अनेकांची मदत घ्यावी लागली.....कुठे कुठे तर आमची टिंगलही होत होती..... ती होणं ही साहजिकच होतं.... कारण आतापर्यंत चिल्लरपणा आणि रिकाम्या कामांशिवाय आम्ही काहि केलंच नाही.....

अंकाचे काम चालु केले तेव्हापासून प्रत्येक पहाट, आमच्या अंकाला नवी वाट देत होती...... नवनविन कल्पना आम्हाला मिळत होत्या; प्रतिष्ठीत व्यक्तींचे मार्गदर्शनामुळे प्रेरित होउन अंगात नवरक्त असल्याचा भास अंक पुर्ण करण्याची आस लागली.....

अचानकच ही विशालची संकल्पना इतकी जोमाने कार्य करेल याचा आम्ही दोघांनीही कधी विचार केला नव्हता...या संकल्पनेला सत्यात उतरवण्यासाठी आधार देणारी टिम, आमच्यासारखेच आमच्यासोबत या अंकामध्ये मिसळू लागले व नवनविन कल्पनेच्या ज्योती पेटवू लागले......

अखेर आज मनापासून मनापर्यंत चा.पहिला अंक आपल्यासमोर आला......

हा अंक आपल्यासमोर सादर
करताना अवर्णनीय आनंद
होत आहे. अखेर
आमच्या गुदमरलेल्या भावना मोकळ्या हवेत
फिरताहेत अशी जाणिव
मनाला होत आहे.

**© विपुल वर्धे....**

( संपादक....)

"मनापासून मनापर्यंत"
वर्ष पहिले, अंक पहिला

# अनुक्रमणिका

म ना पा सू न म ना प र्यं त

संपादकीय लेखणीतून ..... ( विपुल वर्धे ) 2

अनुक्रमणिका 3

T.E.A.M. 4

मनोगत ( विशाल इंगळे ) 5

From the Heart 6

भु मि "ती" ( विपुल वर्धे )

तू म्हणजे... ( विपुल वर्धे )

माझे मन ( विपुल वर्धे )

तलब ( विपुल वर्धे )

प्रेमाचं चांदणं ( विपुल वर्धे )

गारवा ( विशाल इंगळे )

कब्र ( विशाल इंगळे )

जगायचं कशासाठी ( विशाल इंगळे )

इश्क ( विशाल इंगळे )

न जाने कब.... ( सुनिल ऊके )

मैत्री ( वैभव कन्हेरकर )

ग्रामीण तरुणाई मागेच (वैभव कन्हेरकर)

खेळ मांडला ( प्रफुल नाईक )

नेतृत्वचूक ( विशाल इंगळे )

है रूह जुदा मुझ से..... ( विशाल इंगळे )

प्रवासापासुन प्रवासापर्यंत... ( विशाल इंगळे ) 13

जय हो.... ( प्रफुल इंगळे ) 16

लोकशाहीपासून राजकारणापर्यंत... ( विपुल वर्धे ) 17

समीक्षा ( विशाल इंगळे ) 18

रानपिंगळा ( विशाल इंगळे ) 20

Voice of the Hearts... ( विशाल इंगळे ) 23

जुन आणि साहित्य 26

Click on the item to directly go to the page.

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

# Together Everyone Achieves More

## "मनापासून मनापर्यंत"

वर्ष पहिले, अंक पहिला

**संपादक :**

विपुल वर्धे (vicky)

**सह-संपादक :**

विशाल इंगळे (wish)
राहुल कुकलकर
सुनिल उके (ryancho)

**संपादकिय मंडळ :**

प्रफुल इंगळे (satty)
राहुल चोपडे
सायली जोशी (newton)
ऋषिकेश लकडे (hrishi)
युगंधरा जिजणकर (yuga)
आशिष देशमुख (country)

**संपर्कासाठि -**

**ई-मेल :**
1)spicyboy247@Gmail.com
2)wardhevipul@Gmail.com

**भ्रमणध्वनी क्रमांक :**
1)विपुल वर्धे – 7507865471
2)विशाल इंगळे – 9096289635

**वेब अॅड्रेस :**
www.gdmanapasunmanaparyant.blogspot.in

© "मॅगझिन" मध्ये प्रकाशित सर्व साहित्याचे अधिकार व हक्क पुर्णपणे सुरक्षित करण्यात येत आहेत..... कोणत्याहि प्रकारच्या पुर्ननिर्मिती साठि लेखक किंवा संपादकाची रीतसर परवानगी घ्यावी...... तसेच साहित्याची सर्वस्वी जबाबदारी लेखकांची आहे..... प्रत्येक वेळी संपादक लेखकांच्या मताशी सहमत असतीलच असं नाहि....

अंकाकरीता काहि छायाचित्रे हि गुगल सर्च इंजिन वरुन घेण्यात आली आहेत, त्यांचे सर्व हक्क त्या त्या छायाचित्रकाराकडे सुरक्षित......

**अंक सजावट व मांडणी :**

विशाल इंगळे,
विपुल वर्धे,
प्रफुल इंगळे,
सुनिल उके

**संगणकीय अक्षर जुळवणी :**

विशाल इंगळे

**छायाचित्र संकलन :**

सुनिल उके
प्रफुल इंगळे

**प्रकाशन दिनांक : 26 जुन 2014**

मनापासून मनापर्यंत

www.gdmanapasunmanaparyant.blogspot.in

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

# मनोगत

© विशाल इंगळे

मनापासून मनापर्यंत

**नमस्कार मित्रांनो,**

सहसंपादक या नात्याने मनोगत व्यक्त करण्यासाठि मलाच बळिचा बकरा बनवण्यात आलंय.... खरं सांगायच म्हणजे संपादकिय किंवा मनोगत लिहिण्याइतके मोठे आम्हि झालेलो नाहि.... पहिलाच अंक असल्याने मनात फार चुळबुळ चाललीय, आणि भीती वाटतीय ती वेगळीच...... काय लिहावं आणि काय लिहु नये असं झालंय अगदि..... असो "गत"क्षणी मनात आलेलं हे मनोगत.......

आज आमच्या "मॅगझिन" चा पहिला अंक प्रकाशित होतोय, आमचं हे पहिलंच ई-बुक, साहित्याच्या नव्या जगातलं पहिलं पाउल.....
एकाच वेळेस हजारो वाचकांपर्यंत पोहोचणारं ई-माध्यम आज मोठ्या प्रमाणात साहित्याच्या प्रचारासाठि वापरलं जातंय हि अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.....त्यातच खारीचा छोटासा वाटा टाकण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न.....

नाव काहि हि असलं तरी, हि ई मॅगझिन म्हणजे 'चिल्लर' लोकांची मॅगझिन..... जे मनात, तेच ओठांवर, आणि जे ओठांवर, तेच कागदावर...... तीच जुन्या डायरीतली पाने या ई-मॅगझिन निमित्त लॅमिनेशन साठि पाठवत आहोत, असं समजा हवं तर......

खरं म्हणजे आम्हि सर्व साहित्याशी खूप दुरचं नातं असणारे...... पण शिस्तीने म्हणा कि नकळत जडलेल्या सवयीमुळे, वाचनाची आवड निर्माण झाली...... लहाणपणापासूनच वाचनाची आवड असणारे बरेच लोक सहवासात लाभले, आणि नकळत तेच संस्कार आमच्यावर हि घडत गेले.....
वाचनामुळे मग विचार आकार घ्यायला लागले...... प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टिंकडे बघण्याचा दृष्टिकोण हळुहळु बदलत गेला...... फुलांचा गंध, काजव्यांचं सौंदर्य, सगळ्या गोष्टि मी अनुभवत नव्हतो तर जगायला लागलो होतो..... हे नविन जग होतं.... अतिशय सुंदर..... पण याबद्दल कुणाला सांगयचं म्हंटला तर,शब्दच सापडे ना.... मग एक सर्वोत्तम पर्याय सापडला, तो म्हणजे कवितांचा...... जसे सुचतील तसे शब्द, आणि तुमच्या भावना.... कवितांची एक विशेषता म्हणजे, शब्दांवर वजन दिल्यापेक्षा भावनांना जास्त महत्त्व दिल्या जातं..... समजणार्‍याना तर समजतीलच......
मुंबई-पुणे-मुंबई चित्रपटातील स्वनिल जोशींचं एक फार सुंदर वाक्य आहे,
"कविता समजायच्याच नसतात
समजायच्या असतात त्या भावना....."
भावना कळल्या कि बस्स.... शब्दांची खिचडी कशी हि असो.....

महाविद्यालयाच्या वार्षिक विशेषांकाकरीता लिहिलेल्या कवितांपासून खर्‍या अर्थाने माझ्या लिखाणास सुरूवात झाली.....
खरं म्हणजे माझी एक हि कविता मी लिहिलेली च नाहि...., कधी हि, कुठे हि सुचलेले शब्द कागदावर उतरवले आहेत फक्त......
महेंद्र कुलकर्णींची एक सुंदर कविता आहे.....

"कळले मला कधी ना लिहितो उगाच आहे.....
शब्दांत अर्थ माझ्या दिसतो उगाच आहे......"

असंच काहितरी माझ्या सोबतहि घडलं, सहज लिहिलेल्या माझ्या कवितांना काहि जवळच्या मित्रांनी आणि शिक्षकांनी अजून लिहिण्यास उद्युक्त करणार्‍या प्रतिक्रिया दिल्या,..... आता वहिची मागची पाने निळी व्हायला लागली.....
प्रत्येक पावलावर आयुष्य आपल्याला काहि न काहि शिकवत असतं, कधी कधी वेदनादायी क्षण हि येतात तर कधी अशे हि क्षण येतात कि ते क्षण कधी जाउच नयेत असं वाटतं...... हे सर्व काहि शब्दांत मांडण्याच्या प्रयत्नांत मी लिहु शकतो असं वाटत असलं तरी माझा स्वतहावर तिळमात्र हि विश्वास नाहि......

ई-माध्यमाचं हे जग साहित्यात क्रांती घेवून आलं, ई-बुक,ई-वाचनाची एक नविन संकल्पना उदयास आली..... साहित्याच्या या भल्या मोठ्या शहरात एक छोटंसं घर आपलं हि असावं असं वाटायला लागलं......
काहि दिवसांआधी माझा सगळ्यात जिवलग बालमित्र विक्किसोबत मी या मॅगझिन ची संकल्पना मांडली..... आजपर्यंत कधी हि विक्किने माझ्या कोणत्याहि मदतीस नकार दिलेला आठवत नाहि...... त्यामुळे या संकल्पनेबद्दल बोलण्यासाठी त्याच्यापेक्षा योग्य, आणि मुख्य म्हणजे माझ्यासारखीच रिकामी दुसरी व्यक्ती मला सुचलीच नाहि.....
त्याने फक्त माझ्या मदतीसाठी हातच पुढे केला नाहि, तर सर्व मुख्य सुत्रे सांभाळण्याची जबाबदारी हि दर्शवली.....

या ई-मॅगझिनचा पाया आम्हिच रचल्याने बहुधा आमचाच सहभाग जास्त दिसेल..... पण खरं म्हणजे हे सगळं जुळवणं खूप अवघड होतं...... नविन काहितरी करायचं म्हंटला तर नविन च प्रश्न निर्माण होतात...... नुकती आमची टिम एका जागी आणण्यासाठिच कितीतरी हेलपाटे खावे लागले...... मॅगझिन तयार करण्यास जितका वेळ लागला नाहि, त्यापेक्षा जास्त दिवस फक्त मॅगझिन साठि नाव शोधण्यात गेले......
कळत नकळत अनेक पडद्यामागच्या व्यक्तींची आम्हाला मदत झाली...... ई साहित्यच्या अध्यक्षस्थानी असलेले सुनिल दा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे मुख्य लायब्ररीयन डॉ.मोहन खेरडे, आदरणीय अस्वार गुरुजी ई. अश्या अनेक मान्यवरांनी छोट्या छोट्या गोष्टींतून आम्हाला मोलाचं मार्गदर्शन केलं
आम्हाला मोलाचं मार्गदर्शन केलं..... त्याबद्दल मी सदैव त्यांचा ऋणी राहिल.....
फक्त एका शब्दावर स्वताहाच्या पायावर कुर्हाड मारुन घेण्यास, एका पायावर तयार झालेल्या, आणि आपलेपणाने मदतीचा हात पुढे करणार्‍या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.....

या ई-मॅगझिन निमित्त रद्दितल्या धुळ खात पडलेल्या माझ्याच कविता बर्‍याच दिवसांनंतर परत वाचायला मिळाल्या..... परत जगायला मिळाल्या....
या मॅगझिन निमित्त आम्हि सर्व जिवलग मित्र एकत्र आलो..... एका नविन आयुष्याला सुरुवात करत असताना, आम्हि सर्व एकत्र आहोत हि सर्वात आनंदाची गोष्ट......

ई-साहित्याच्या क्षेत्रातील वाटचालीत हे नुकतंच पहिलं पाउल आहे.....
नकळत अनेक चुका झाल्या असतील तर त्याबद्दल मी स्वताहून पुर्ण टिम तर्फे माफी मागतो......

कविता आवडल्या, लेख आवडलेत, अंक, संकल्पना..... तर आम्हाला नक्कि कळवा.....
काहि तक्रार असेल तरी कळवा......
या अंकाला तुमच्या प्रेमाची आणि पुढिल वाटचालीकरीता बहुमोल मार्गदर्शनाची आशा करतो......

**- विशाल इंगळे**
**( सह-संपादक )**

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

मनापासून मनापर्यंत

From the Heart

“ मनापासून मनापर्यंत ”
वर्ष पहिले, अंक पहिला

# भु मि “ती”

माझ्या मनाच्या वर्तुळाला......
तुझे मन काटकोन त्रिकोणात छेदतात.......
sin cos सोडवल्यावर
आठवणी सुद्धा रुसतात .....
त्रिज्येचे वार
मन मोकळे करुन जातात....
भावनांचे वारे....
पायथ्यागोरस च्या प्रमेयात ......
खेळतात...

.© विपुल वर्धे

# “ तू म्हणजे... ”

तू
म्हणजे दरवळणारा वारा ........
सध्या जरी जवळ असला ,,,,,,,
पण काही वेळाने निघुन जाणारा ........
कळत नकळत,,,,,,,,,
माझ्या मध्ये खेळणारा ........
खेळ संपला की ,,,,,,,,,
हलुवार निघुन जानारा.........
भेटीची शितलता माझ्यात
ठेवनारा......
आठवणीची ज्वाला उखळनारा .....
तू म्हणजे दरवळणारा वारा....
हळुवार माझ्या आयुष्यातुन
निघुन जानारा.....

.© विपुल वर्धे

# “ माझे मन ”

फुलासारख्या नाजुक तुझ्या मनाला
फुलपाखरु होऊन छेडते माझे मन
तुझ्यामधला अर्क पिऊनी गार हवेत
उडते माझे मन.....

नेहमी का तुझ्याच भोवती फिरते माझे मन?
न जाने का त्या ओलाव्यात रमते माझे मन.....

अतृप्त त्या भेटीची वाट पाहते माझे मन
स्वप्नांमधील पंखांना घेउन उडते माझे मन.....

प्रेमाच्या या पावसाने चिंब झाले माझे मन
आठवणीच्या प्रवाहाने वाहत गेले माझे मन....

आठवणीच्या प्रवाहात वाहता वाहता
तुझ्या मनाला भेटले माझे मन
त्या अदृश्य भेटीला कसे का पाहुन गेले माझे मन.....

© विपुल वर्धे

क्षणात साऱ्या स्वप्नांना
जाग कसे हे आले
पाउस नव्हता प्रेमाचा
कोरडे होते ते वारे

© विपुल वर्धे

# “ तलब ”

माझ्या हाडाची दशा जिर्ण झाली
तंबाखु, गुटखा, C-ग्रेट यांना
दारुची साथ पुर्ण मिळाली

अनेक भावनांचे वारे
सिगरेट च्या धुव्यात उडून गेले
हृदयातील स्पंदने झिरपून गेले

ओठांवरील आठवणी गुटख्याच्या थुंक्याने बाहेर आल्या
पोटातील खळबळ दारुच्या नशेत धुंद झाल्या......

© विपुल वर्धे

# “ प्रेमाचं चांदणं ”

तुझ्या मनातल्या आकाशातलं चांदणं
माझ्या मनातल्या अंगणात दिसतं
का बरं असं असतं
प्रेम......
न बोलताच ते कळतं
न दाखवताच ते दिसतं.

© विपुल वर्धे

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

मनापासून मनापर्यंत




# “ गारवा ”

काल थंडि खुप होती
गारवा अंगावर काटे आणत होता
हवेचा प्रत्येक स्पर्श तुझी आठवण करुन देत होता
वाटलं काश तु माझ्यासोबत असतीस
अंगावर तुझी पांघरुण तर असती
ऐवढ्या थंडितहि तुझ्या मिठित ती रात्र उबदार
असती....

© विशाल इंगळे

# “ कब्र ”

जब डुब रहि थी कश्ती,
हाथ तो बढाया नहि...
अब जनाजे पे मेरे अफसोस बया ना करो

चाहे समझा था तुमने पाणी मेरे अश्को को
पर कब्र पर मेरे हर रोज यूँ
मोतीयों को छलकाया ना करो

जिंदगी में जगहा ना दे पायी तुम
थोडि इसका गम कुछ नहि
जा तो चुका हुँ अब जिंदगी से तेरे,
बार बार आ के यहाँ अब फिर से
रुलाया ना करो

© विशाल इंगळे

“मनापासून मनापर्यंत”
वर्ष पहिले, अंक पहिला

# “ जगायचं कशासाठी ”

वाटतं वादळ हे हि नाहि विध्वंसक
माझ्या मनाच्या वादळापेक्षा
त्सुनामीही काहिच
नाहि स्वप्नांना वाहुन
नेणाऱ्या आसवांच्या लाटांपेक्षा

माहितेय तु नसणारेय नजरेसमोर आता
डोळेच न उघडावसं वाटतं
खोल
तळाशी सागराच्या कोठेतरी नेहमी करिताच
हरवावसं वाटतं

तु गेल्यावर सोडून, अंधाराशीच झालीय
मैत्री
तुझ्याविना आता जगण्यासारखे काहिच
नाहि, वाटतात
तुटल्यासारखी जीवनाशीही नाती

तुझयाविना आता
जगायचं तरी कशासाठी ..........

© विशाल इंगळे

# “ इश्क ”

समशान की उस कब्र कि तरह है
मेरी दास्ताँ, ऐ दोस्त
ना कफन पहनाने कोई आया,
ना कंधा देने कोई.....

कहि रस्मो-रीवाज के नाम,
कहि रिश्ते, दस्तूर और मजबुरिओँ के नाम पर,
जिंदगी को वो मेरे अँधेरे के नाम कर,
दिल के तुकडे कर के वो चली गयी,
ना संभालने कोई आया,
ना समेटने कोई.....

समाज ने भी ना जाने जिंदगी को कैसे
रंगो से भर दिया,
इश्क का रंग ही जो यूँ फिका पड़ गया,
दूर कहि छोड़ गये उस चिराग कि तरह,
न जलाने कोई आया,
ना बुझाने कोई......

© विशाल इंगळे

अगले जनम खुदा से, मांग लुंगा कांच का दिल
फिर चाहे जितनी बार, पत्थर मार के तोड देना......

© विशाल इंगळे

मनापासून मनापर्यंत

From the Heart

# “ न जाने कब.... ”

जाने क्यों खफ़ा हैं, मोहब्बत से दुनियावाले?
लगता है इनका दिल धड़कना बंद हो गया है.....

---

उस जहनसीब की मोहब्बत ने हमको दीवाना बना दिया.....
कुछ इस कदर खफ़ा है, इश्क से ज़माना
इस जमाने ने हमको बेगाना बना दिया.....

---

हमने इज़हार-ए-मोहब्बत की जुर्रत जो कर ली
उस नादान ने खुदा से हमारी शिकायत कर ली
अब इस मोहब्बत का आलम तो देख ऐ दोस्त
वोह तो बिछड़ गयी,मगर खुदा ने हमसे आशिक़ी कर ली.....

© सुनिल ऊके

लोग छोटी छोटी बातों से खफ़ा हो जाते है......
छोटी छोटी बातों पे खुश होना कब सीखेंगे.......?

ज़िंदगी की दौड़ मे चले जा रहे है यूँ ही....
कही रुक के थोडी साँस लेना कब सीखेंगे.....?

छोटी सी गलती से रिश्ते तूट जाते हैं यहाँ....
बचपन का फसाना, रूठ कर मनाना कब सीखेंगे....?

राह चलते बारिश हो तो छत ढूंढने लगते है सब......
छतसे निकलकर बूंदे चुराना कब सीखेंगे....?

लोगों की भीड़ में खुद की पहचान खो देते है......
अकेले बैठकर खुद को पहचानना कब सीखेंगे......?

हर किसी को अपने औदे का गुरुर है यहाँ.......
नज़ाकत में सादगी लाना कब सीखेंगे.....?

कुछ बहाने दर्द भरे देती रहती है ज़िंदगी.....
सौ बहाने खुशियों भरे ज़िंदगी को देना कब सीखेंगे.....?

हर कोई बेहोशी में अपनी ही बात कहे जा रहा है......
कुछ मेरी सुन कुछ अपनी सुना यह अंदाज -ए-गुफ्तगू कब सीखेंगे.....?

किसी एक गलती पे दुश्मन बना के ज़ेहन में बसा लेते हैं....
माफ़ कर के भूल जाना कब सीखेंगे....?

लोग खेलते है यहाँ दूसरों को हराने....
खुद जीतने के लिए खेलना कब सीखेंगे.....?

© सुनिल ऊके

# “ मैत्री ”

मैत्री आपली ही
मना-मनातून जपलेली
कधी ही न तुटणारी
मैत्री ही आपली
त्यागाची प्रेमाची
निस्वार्थ भावनेची
घट्ट अशी जुळलेली
मैत्री ही आपली
मैत्री तुझी अन माझी
भावबंध भावस्पर्शाची
अशीच खरी निरंतर
जपत राहणारी

© वैभव कन्हेरकर

# “ ग्रामीण तरुणाई मागेच......! ”

तरुणाई म्हणजे जोमाने ओसंडून वाहणारा उत्साह. मात्र, आज ग्रामीण तरुणाई मागे असल्याचे चित्र दिसत आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागांत असलेली अपुरी सुविधा, याउलट शहरातील तरुणांचा भरपूर विकास झालेला दिसून येतो. सुसज्ज व अद्दयावत महाविद्द्यालये,विविध संस्थामार्फत चालविली जाणारी मार्गदर्शन केंद्रे, विविध शिबिरे; ज्याद्वारे शहरातील तरुण प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करीत आहेत. त्या तुलनेत मात्र ग्रामीण तरुणांची इच्छा असूनसुद्धा योग्य मार्गदर्शनाअभावी ते प्रगती साधू शकत नाहीत. ग्रामीण भागांत बहुतांश तरुणांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने त्यांना शहरात शिक्षण घेणे परवडत नाही. त्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. ग्रामीण भागांत रस्ते, वीज, पाणी, रोजगार यांचा तुटवडा वाढतच चालला आहे. त्यातच वीज भारनियमन आणि इतर समस्यांच्या विळख्यातून मार्गक्रमण करीत आजचा ग्रामीण युवक स्पर्धेच्या युगात टिकेल का? असा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व बाबींचा विचार करून शासनाने शहरी सुखसुविधांप्रमाणे ग्रामीण भागांतसुद्धा अत्याधुनिक सुविधा प्राप्त करुन दिल्या पाहिजेत. तसेच सरकारी व निमसरकारी संस्थानीसुद्धा ग्रामीण भागांत मार्गदर्शनाचे काम केल्यास, ग्रामीण तरुणाईचा विकास होईल आणि ते आपले योगदान देशाच्या सक्षमीकरणामध्ये अवश्य देऊ शकतील.

© वैभव कन्हेरकर

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

मनापासून मनापर्यंत

From the Heart

# “ खेळ मांडला ”



कोवळ्या वयात आल्यावर
शिक्षणापासून दूर मला करतात,
लग्नाच्या नावाने
माझा बाजार मांडतात.....
माझे स्वप्न नेहमी
माझ्या डोळ्यात बंद राहतात,
लग्नाच्या बेड्या घालून
खुला बाजार मांडतात.....
आई समजत नाही माझ्या भावना
वडिलांनाही माझा त्रास होतो,
माझे स्वप्न डांबून
माझाच विश्वासघात होतो......
नशिबानेही साथ सोडली
आई-वडिलांनी हाथ सोडला,
आयुष्याचा खेळ बनवून
माझाच खेळ मांडला......
माझ्या रक्षणासाठी कायद्याने
तरतुदी अनेक केल्या,
तरीही माझ्या आयुष्याचा
नेहमी खेळ मांडत गेला....

© प्रफुल नाईक

मनापासून मनापर्यंत




# “ नेतृत्वचूक ”

**1:**


भीती वाटते बाबा
बोलायची
आकांत ह्रदयातला
व्यक्त  करण्याची
अन्यायाविरुद्ध
आवाज उचलण्याची.....
मनात प्रश्न अनेक
पण
उत्तरे मात्र नाही
बाबा तुझ्या
लेकरांत ऐकी नाही.....
दोन मुलांचे तुझ्या
दोन बाप असतात
कुणीही बसणारे
तुझ्या
तत्वात नसतात......
हाकेला येणारे
सभोवताली कुणी नाही
म्हणुन आज हिम्मत
बोलायची होत नाही.....

बाबा
आज तू यांना
शिकवायला हवा होता
संघटनाचं महत्त्व
सांगायला हवा होता....
बाबा तुझी सारी
जेव्हा
लेकरे एक होतील
मनातील शब्द
ओठांवर येतील
जेव्हा कशाचीही
भीती उरणार नाही
शब्दांना माझ्या
तेव्हाच बळ येईल.....

© विशाल इंगळे

**2:**

बाबा तुझ्या नेत्यांची
काय गती ही झाली?
सत्तेच्या लोभापायी
दोन दिशांनी गर्दी झाली....
मंत्रीपदाचं दाखवून आमीष
त्यांनी ह्यांना खेचलं
खासदारकीची लाच देऊन
तोंड ह्यांचं दाबलं......
संघर्ष संपला नाही
अजूनही
पसरलेलं धर्माचं जाळं आहे
ह्रदयातील आग
आणि
एकीतच
आपलं बळ आहे.....
बाबा तुझ्या नेत्यांना
नाही का हे कळलं?
बाबा या दलालांनी तुलाच विकलं
तुझ्या विचारांचा मांडणार्‍या बाजार
या भड्व्यांना




कुणी खेटरानं का नाही धुतलं?
बाबा तुझ्या विचारांना
आता इथे थारा नाही
विद्रोहाचा
क्रांतीचा आज तुझ्या
कुठेही वाहत वारा नाही......
तू चेतवलेला वणवा
ह्यांनी केला थंड आहे
तुझ्याच नावावर पुकारला ह्यांनी तुझ्याच
विरोधात बंड आहे.....

© विशाल इंगळे

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014





# है रूह जुदा मुझ से.....

इश्क़ के समंदर में कई, कश्तीयाँ डूब जाती है,
न जाने इस राह पे, क्यूँ निकलते है राही?
मंजिल पे गौर करो, तो राहें खो जाती है......
होके भी जुदा तुझसे, मै जुदा न हो सका
बिछड के तुझ से मै, अपना न हो सका
दिन रात दिल में मेरे, तेरी आरज़ू होती है
खुदा से बस्स, तेरे बारे में गुफ़्तगू होती है
ज़िंदगी में मेरे सिर्फ, तेरे प्यार की रियासत है
यूँ तोड दिया दिल क्यूँ, इतनी सी शिकायत है
तेरे बिना आजकल, नींद भी नहीं आती
शराब उतर जाती है, तेरी याद नहीं जाती
हालत मेरी ले आई, क़यामत के आँख आंसू
उस कश्मकश को, किन लफ़्जों में बया करू
सिसकते हुये ओठों से, क़यामत मुझ से बोली
ऐसा शख्स न देखा कभी, जिस्म बिना रूह....
मैं बोला ऐ-क़यामत, हैं दुआ तुझसे
चाहता हूँ जिसे, मिला दे मुझे उससे

जो चाहे, वो क़हर तू ढ़ा ले
व़ोह ही हैं रूह मेरी और रूह जुदा मुझसे.....

© विशाल इंगळे

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

मनापासून मनापर्यंत

# प्रवासापासून प्रवासापर्यंत...

© विशाल इंगळे

माझ्या जिवनातील हा शेगांव प्रवास म्हणजे एक अविस्मरणीय प्रसंगच आहे.......

विक्की, मी, आणि राहुल....आम्ही तिघेही अतिशय जिवलग मित्र......! आता इथे जिवलग म्हणजे फक्त नावापुरते नसुन वेळप्रसंगी गरज पडल्यास खरच एकमेकांसाठी जिव दिला असता असे मित्र मला सुदैवाने लाभले.....

दोन दिवसानंतर राहुलचा बर्थडे येणार होता..... विक्की आणि मी गेल्या दोन अडिच महिन्यांपासूनच राहुलसाठि सरप्राईज पार्टि प्लॅन करण्याच्या मागे लागलो होतो...... त्या दोघांनीहि शेगांव कधीच बघितले नसल्यामुळे शेगांव मध्येच बर्थडे पार्टि करण्याचा बेत ठरला.....खरं तर आम्ही तिघेहि सोबत कुठंतरी जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होणार होता..... पण येन वेळेवर राहुलला अर्जंट काम आलं आणि आमच्या दोन अडिच महिण्यांच्या मेहनतीचा बट्याबोळ झाला...... शेवटि मग विक्की आणि मी आम्ही दोघांनीच निघायचं ठरवलं आणि दुसऱ्या दिवशीच्या प्रवासासाठि पुर्वतयारीस सुरुवात केली.....

आमच्याच एका मित्राने आम्हाला कुरुम स्टेशन पर्यंत सोडुन दिले..... शनिवार दिवस होता आणि शनिच्या साडेसातीची सुरुवात येथुनच झाली.... मी असं म्हणतोय कारण सर्व कामे अगदि योग्य वेळेवर व्हावीत अशे धडे आम्हाला लहाणपणा पासुनच मिळत असल्याणे आम्हि आधीच अर्धा तास अगोदर स्टेशन वर येउन पोहोचलो होतो......पण सरकारी कामे किती वेळेवर होतात हे तुम्हाला माहित असेलच..... तर रेल्वे एक तास लेट होणार होती...... आता 3 गावे ओलांडुन परत माघारी जावुन येणे शक्य तर नव्हतेच पण ज्या पद्धतीने गावातील सर्व मित्र मंडळीन्नी आमचा निरोप समारंभ पार पाडला होता,विचारु नका....., सांगायचं तात्पर्य एवढंच कि 1आणि अर्धा असा एकुण दिड तास स्टेशन वरची "हिरवळ" बघण्यातच गेला.....

विक्की आणि माझी मैत्री हि आमच्या जन्मापासुनच...... विचारांत फार वेगळेपण असुनहि, आमच्या तिघांच्याहि मैत्रीत कधी काहि फरक पडला नाहि ,उलट चालणाऱ्या वेळेसोबत आमच्या मैत्रीची आगगाडी तुफान वेगाने धावतच होती, तिहि वाढत्या वेगाने..... पण आमच्या मैत्री ची एक वेगळीच बात....

विक्की आणि माझं घर अगदि समोरासमोर.... दोघांच्याहि घराला एकच अंगण म्हणा ना..... त्यामुळे आमची मैत्री हि लंगोटि पेक्षाहि जुनी......

मजेशीर बाब म्हणजे माझे काका आणि त्याचे काका हे पण जिवलग लंगोटि यार....त्यांची गावात एक वेगळिच ओळख होती....... ती म्हणजे त्यांची बोलण्याची शैली..... गुप्त सम्भाषणाकरीता ते अक्षरांची आलटापालट करुण बोलत..... उदाहरणार्थ सांगायचं झालंच तर दिक्षाभुमी स मीभुक्षादि किंवा क्षादिमीभु वगैरे...... कधीकधी तर नविन शब्द आणि असणारा शब्द यात काडिचाही सम्बंध नसायचा..... याच्याच जोडिला त्यांच्या बोलण्याच्या प्रचंड वेगामुळे , विषय तर सोडाच पण शब्द हि कोणी पकडु शकत नसे...... त्यांच्या सहवासात असल्याने आम्हाला हि शैली वारश्यातच मिळाली.... पुर्णपने त्यांच्याप्रमाणेच आत्मसात करु शकलो नसलो तरी आम्ही त्यातच थोडंस संशोधन करुन आम्हि आमची स्वतहाची अशी वेगळिच संभाषण शैली निर्माण केली होती..... असो, तर एकदाची आमची भुसावळ एक्सप्रेस प्लॅट्फोर्म वर येउन थांबली आणि मित्राचा निरोप घेउन आमच्या टवाळक्यान्ना सुरुवात झाली...... शेगाव च्या गजानन महाराजांबद्दल आस्था असनाऱ्या भाविक भक्तांसोबतच ,

सुट्ट्या एंजोय करण्यासाठि मित्र-मैत्रिन्नीसोबत फिरायला येनार्या अनेक विद्यार्थी-विद्यार्थीन्नींच्या घोळक्याने डबा अगदि गच्च भरला होता..... शेवटि रेल्वे च्या दारात उभं राहुनच शेगावपर्यंत प्रवास करावा लागला..... आमच्या टवाळक्या यादरम्यान सुरुच होत्या म्हनुन शेगाव कधी आलं हे कळलंच नाहि.....

माझ्यासाठि शेगांव तसं काहि नविन नव्हतं पण



विक्की ची शेगांव भ्रमणाची पहिलीच वेळ असल्याने आणि शेगांव बद्दल बरच काहि एकलेलं असल्याने एक विशेष आकर्षण होतं ..... भाविक भक्तांसाठि दोन वेळचं जेवण मोफत असतं असं आम्हि ऐकुण होतो.... म्हणुन खिशात फारसे पैसे नसुनहि विशेष असं काहि टेंशन नव्हता...... 3-4तासांच्या प्रवासामुळे पोटात कावळ्यांची कावकाव सुरु झाली होतीच..... आणि दर्शनाच्या रांगेत बराच वेळ उभं राहल्याने भुख अजुनच वाढली होती...... दर्शन झाल्यावर आम्हि लगेच भोजनकक्षाकडे मोर्चा वळवला.... पण आमचा निघन्याचा तो मुहुर्त कुठला कोण जाणे ,महाप्रसादाची वेळ सम्पली होती.....अश्या रितीने आमचा मिठ्ठु पडला आणि आमच्या आनंदाला चंद्रग्रहन लागले..... खिशात पैशे आधीच कमी होते , आणि अजुन पैशांची निकड कुठे भासेल याची हि पुर्वकल्पना नसल्याने फक्त एक प्लेट पुरिभाजी ओर्डर करुन,भेट्लेल्या फक्त 8 पुर्या , कथेतील आपल्या भावावर अत्यंत प्रेम कर्नाऱ्या बहिणीने मिळालेल्या एकाच तिळाचे 5 सम भाग करुन वाटुन द्यावे.... तश्या चार चार पुऱ्या वाटुन घेतल्या......

Giovanni Cultrera

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

म ना पा सू न म ना प र्यं त

# प्रवासापासून प्रवासापर्यंत...

© विशाल इंगळे

पोट भरलं नसलं तरी हि उजव्या खिशातिल 75% उरलेले पैसे आणि डाव्या बाजुचा फाट्लेला खिसा बघुन ,चला मस्त जेवन होतं, पोट भरुन जेवण झालं ., अशी स्वतहालाच आणि एकमेकान्ना खोटि सांत्वना देउन शेगांव भ्रमंतिस सुरुवात केली...... अर्थात संध्याकाळी तरी पोट भरुन जेवण मिळेल आणि ते हि मोफत..... अशी थोडिशी आशा होतीच..... सद्ध्याच अर्थशास्त्र हे आमच्या संख्याशास्त्रात बसण्यासारख नसल्याने ,सम्पुर्ण शेगांव आम्हि पायाखाली च तुडवले.... संध्याकाळी मात्र पायाला चालुन चालुन आलेल्या फोडान्नी शरीर शास्त्राची पुर्णपणे ओळख करुन दिली...... रात्रीच्या जेवनासाठि भोजनकक्षेकडे वळल्यावर फक्त एकाच वेळेस मोफत जेवन उपलब्ध होतं हे माहिती पडल्यावर मात्र दिवस पौर्णिमेचा नसुन अमावस्या असल्यासारखा भासायला लागला.... आणि



घरुन निघताना नक्किच काळि मांजर आडवि गेली असेल असं वाटायला लागलं...... असो थोडासा खिसा अजुन हलका करुन आम्हि भोजनकक्षेकडे प्रस्थान केले....... पाच सहा वर्षांत येथे अमुलाग्र बदल झाला होता...... भक्तांच्या देवावर होणार्‍या क्रुपेचा तो फरक..... भाविक भक्तांची अपार आस्था त्यान्ना या पवित्र ठिकाणी ओढुन आणते..... आणि आपल्याला जमेल त्या पद्धतीने खुल्या हातान्नी भाविकगण दान करत असतात.... मुख्य म्हणजे ठरलेल्या रकमेपेक्षा एक दमडि पन येथे जास्त घेतल्या जात नाहि..... याबद्दल आमच्या सोबत घडलेला एक मजेशीर प्रसंग म्हणजे बॅग ठेवन्यासाठि लाॅकर अरेंज करताना दोन रुपये सुटे नाहित म्हणुन आम्हाला 30-35 मिनिटे वाट बघावी लागली..... उलट आम्हि सुटे नसेल तर परत न करता वरचे तीन रुपये स्वतहाकडे च ठेवा अस पण म्हनुन बघितलं होतं पण नियमाप्रमाने त्यान्नी एक रुपया हि जास्त घेतला नाहि..... शेवटि गरज नसतानाहि बाहेरच्या दुकानातुन तीन रुपये खर्च करुन पैसे सुटे केले आणि लाॅकर घेतला...... भोजनकक्षेतील कर्मचार्‍यांबद्दल हि असाच काहि अनुभव आला...... एका वयोवृद्ध व्यक्तिसोबत कर्मचार्यान्ना उद्धट वागताना पाहुन फार वाइट वाटले ,मुख्य म्हणजे दोघांच्या वयात अंतर बघता कर्मचार्‍याच्या वडिलांच्या आणि त्या व्यक्तिंच्या वयात जास्त अंतर असल्यासार्खे जानवत नव्हते..... असो अपना काम बनता तो भाड मे जाये जनता, या उक्तीप्रमाणे..... आम्हि मुकाट्याने जेवण करुन बाहेर पड्लो, दाराजवळ ठेवलेल्या तक्रार पेटित मात्र येथील व्यवस्थेबाबत EMS बरोबर आहे पण EMS बरोबर नाहि म्हणजे ईटिंग मॅनेजमेंट सिस्टिम बरोबर आहे पण एम्प्लोयी मॅनेजमेंट सिस्टिम बरोबर नाहि अशी प्रतिक्रिया टाकुन काढ्ता पाय घेतला..... जेवनाबद्दल बोलायचा झालं तर ,इतका झक्कास जेवन गेल्या कित्येक दिवसांत झाला नव्हतं.... आम्हि अट्टल बेवडे नसलो तरीहि , मित्रांसोबत बर्थडे पार्टि , 3st वगैरे बियर वगैरे घेत असु..... दुसर्‍या दिवशीच जेवन वगैरे आणि घरी परत जाणे होइल याची पुर्ण खात्री करुन तेवढे पैसे सोडुन बाकिचे पैसे वेगळे काढुन घेतले ,जेमतेम 60 रुपये होते..... एवढ्या पैश्यांत बियर तर साहजिकच शक्य नव्हती.... मग बराच वेळ वादविवाद झाल्यानंतर देशी दारु ची एक बाॅटल घेतली..... आम्हि दोघं हि देशी फर्स्ट टाइम च घेणार होतो..... पण देशी दारु च्या फक्त वासानेच विक्किला उलट्या झाल्या...... दिवसभरातील खाण्यापिण्यात गेलेले सर्व पैसे साहजिकच वाया गेले होते..... आता वडिलांची मेहनतीची कमाई वाया जाऊ नये म्हणुन पुर्ण बाॅटल नाईलाजास्तव मला एकट्यालाच गटकावी लागली.....

थोडा वेळ अजुन शेगांव भ्रमंती करुन आम्हि मंदिराकडे परतीस निघालो..... आम्हि बराच वेळ जिथे घालविला होता....त्या भक्तिसंकुलासमोर आम्हि येउन बसलो...... चार-पाच वर्षांआधी मी मित्रासोबत येथे आलो होतो तेव्हा मोबाईल चार्जिंग चा एक मोठा प्रश्न निर्माण झाला होता...... कुठेच शोधुनहि प्लग मिळत नव्हता..... असं च फिरता फिरता मग हि जागा दिसली होती..... असो आमचा कॅमेरा चार्ज करण्यासाठि लावुन आम्हि.... आसपासच्या परिसराच निरिक्षण करत होतो....... संख्याशास्त्राचे विद्यार्थी असल्यामुळे आमच्यात स्वभावताच हा गुण निर्माण झाला होता..... काहि वाचकांसाठि हे आक्षेपार्ह असु शकत पण एका मुलीला बघुन आम्हि दोघं पण अगदि शाॅक झालो..... आई शप्पथ जिवनात अशी मुलगी कधी बघितली नसेल.... पण नशीबाने इथेहि साथ दिली नाही....
.. आणि तिच्या गळ्यातल मंगलसुत्र बघुन......., जाउ द्या..... एकदाचा कॅमेरा चार्ज झाला आणि आम्हि मंदिरात परतलो.... पैशांच अंकगणित बघता एक च गादि घेउन अड्जस्ट करुन आम्हि कसं तरि झोपलो.... रात्री आम्हि फार उशिराच झोपलो होतो... पण येथील सफाई कामगारान्नी निट झोप हि घेउ दिली नाहि ,अर्धनिद्र अवस्थेत गादि परत करुन आम्हि मंदिराच्या बाहेर

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

म ना पा सु न म ना प र्यं त

# प्रवासापासुन प्रवासापर्यंत...

© विशाल इंगळे

पड्लो..... टपरिवरच्या चहावाल्याने च आम्हाला दंतमंजन ऑफर केल..... कमीत कमी हे तरी आम्हाला नक्किच एक्स्पेक्ट नव्हत..... त्याच टपरी वरच्या अप्रतिम चहाचा आस्वाद घेत आम्हि त्या सुखद आणि रम्य सकाळ चा आनंद घेत होतो.....

कालपासुन आजपर्यंत आम्हि एवढ्या टवाळक्या केल्या होत्या कि आमची गुप्त सम्भाषण शैली नसती तर आमचं राम नाम सत्य नक्किच होतं.....

आम्हि प्रत्येक शब्दामागे उगिचंच काम नसतानाहि MS जोडत असु.... उदाहरनार्थ सांगायचा झाल च तर , चहा साठि TMS, बस साठि STMS ,वगैरे...... बर्याच वाचकांस अजुनहि काहि कळले नसेल तर , टेंशन घेऊ नका कारण कळु नये म्हनुन च तर ऐवढा खटाटोप....

नेहमीच्या सवयीप्रमाणे सर्व दुकाने फिरुन आम्हि काहि नविन विशेष अस काहि शोधन्याच्या बेतात होतो.... एक लॉकेट आम्हाला दोघान्नाहि फार आवडले होते.... पन त्या 1रुपयाच्या नान्यापेक्षाहि अर्ध्या साईजच्या लोकेट्ची किम्मत आमच्या खिश्यातल्या पैशांपेक्षा हि दुप्पट होती.... पुढच्या वेळेस आल्यावर आपण नक्कि खरेदि करु अस ठरवुन आम्हि दुकानातुन बाहेर पड्लो.... बॅग्स वगैरे घेउन आम्हि एका गाडिवर नाश्ता केला आणि आनंद सागर साठि बस स्थानकाकडे निघालो.... भाविक भक्तांसाठि आनंद सागर पर्यंत मोफत बस सुविधा असल्याचे कळल्यावर तर आमच्या आनंदाला पारावार च उरला नाहि..... पण इथेहि एक प्रोब्लेम होता च , रांगेत उभा राहन्याचा..... आमच्या समोर उभी असलेली एक सुंदर मुलगी आमच्या टाईमपास चा तात्पुरता विषय बनली.... आमच्या गोश्टी चालु असतानाच आमच्या मागे असलेल्या एका सद्ग्रुहस्थाने तुम्हि MBBS ला आहात का असा अनपेक्षित प्रश्न केल्यावर आम्हाला हसु आवरेनास झाल..... शेवटि फक्त 'नाहि' एवढच बोलुन आम्हि त्या सद्ग्रुहस्थास फुग्ग्यात घेतले..... आणि पुन्हा आमच्या गोश्टिंस सुरुवात केली.....

शेगांव मध्ये काहि बघण्यासारखे असेल तर आनंद सागर..... येथील झुलत्या पुलाबद्दल आम्हाला अतिशय चढवुन सांगन्यात आले होते..... पण झुलत्या पुलाने आम्हाला पुरते झुलवुन टाकले..... विक्किच्या मोठ्या अधिकार्याचा त्याला फोन आला , दोन दिवसानंतरची त्याची मिटिंग आता उद्याच होणार होती..... म्हणजे आता परतीसाठि आम्हाला निदान 4-5 तास आधीच निघायला लागणार होते...... येथे फिरताना आमच्या वयापेक्षाहि अर्ध्या वयाच्या मुलीबरोबर चाळे करनार्या आमच्या पेक्षाहि दुप्पट वयाच्या ईसमास बघुन माणसाच्या विकुत बाजुचीहि जाणिव झाली...... जेवढ्या लवकर शक्य होइल तेवढ्या लवकर पुर्ण आनंद सागर पालथे घालुन आम्हि जेवनाची आॅर्डर दिली..... पोट भरुन जेवन झाले खरे पण मला हे जेवन पचलेच नाहि...... आम्हि दोघं जेवननंतर एका झाडाच्या आडोश्याला विश्रांती घेत होतो..... अचानक पोटात कळा यायला लागल्या...... तेवढ्यात माझ्या स्थानिक मैत्रिणीचा मला कॉल आला..... या दोनहि गडबडित मी कसे तरी प्रसाधन ग्रुह शोधुन लगबगिने आत घुसलो..... मध्येच मला बाहेर काहि स्त्रियांचा आवाज ऐकु आला..... पुरुषप्रसाधनग्रुहातील अनपेक्षित आवाजाने मला काहितरी चुकचुकल्या सारखे वाटले......पण त्या कदाचित तेथील सफाई कर्मचारी असतील अशी मी स्वतहाची समजुत घालुन घेतली..... नंतर थोडा फ्रेश होवुन मी बाहेर पडलो..... विक्किने मला त्याच्याकडे येताना पाहल्यावर तो जोरजोरात हसायला लागला...... मी त्याच्या अगदि जवळ जाईपर्यंत तो हसता हसता जवळजवळ जमीनिवर च लोळायला लागला होता..... घामाने ओलाचिम्ब झालेल्या अवस्थेत त्याला असे हसताना बघुन मला काहिच कळत नव्हते..... बराच वेळ गेल्यानंतर कसतरी स्वतहाला सावरत त्याने मला प्रश्न केला कि , तु कुठे गेला होतास......? मी त्याला प्रसाधन ग्रुहाकडे इशारा करुन काहि सांगायच्या आधीच भिंतीवर्च्या वरच्या स्त्री चित्राकडे आणि खाली लिहिलेल्या स्त्री प्रसाधन ग्रुहाने माझे लक्ष आकर्षित केले ,आणि विक्किने पुन्हा जमिनीवर लोटांगन घालायला सुरुवात केली.... आता घामाने अंघोळ करायची वेळ माझी होती...... स्त्री आनि पुरुष प्रसाधनग्रुह अगदि जवळजवळ असल्याने आणि मोबाईल च्या गडबडित मी चुकुन...... आणि मघाशी येनार्या स्त्री प्रसाधन ग्रुहातील आवाजाच रहस्य आता चांगलच उलगडलं होतं ...... मी गेलो होतो तेव्हा विक्कि अर्धनिद्रेत होता..... मी बराच वेळ आलो नाहि हे बघुन त्याने माझा शोध घ्यायला सुरुवात केली होती, पण बॅटरी संपल्याने तो मला कॉल करु शकत नव्हता..... या दरम्यान त्याला पण अशीच गफलत झाल्याची शंका हि आली होती.... पण मग मी कदाचित माझ्या मैत्रिनीला भेटायला गेलो असेल असा समज करुन तो वाट बघत बसला...... दरम्यान त्याने आसपास चा पुर्ण परिसर शोधुन काढला होताच.....

मी स्त्री प्रसाधनग्रुहात प्रवेश करेपर्यंत आणि तेथुन बाहेर येईपर्यंत दुरदुरपर्यंत कुठेहि विक्किला सोडुन कुणीच नव्हतं, हिच गजानन महाराजांची कृपा..... हसताहसताच आम्हि तेथुन त्वरीत पळ काढला..... जर कुणी चुकुन मला आत बघितलं असतं तर आयुष्य भराची अद्दल घडली असती...... त्या दिवसानंतर तर मी स्वताहाच्या नावाची पाटि हि 7-8 वेळा "अति-निरिक्षण" करुन बघितल्याशिवाय स्वताहाच्याच घरातहि प्रवेश करत नाहि.....

© विशाल इंगळे

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

म ना पा सू न म ना प र्यं त




# “मनापासून मनापर्यंत”

वर्ष पहिले, अंक पहिला

एक भारतीय सैनिक, जरिहि तो एक सरकारी नौकर असला तरीही त्याची एक वेगळीच ओळख असते..... त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण,तसेच "सैनिक आहे तो मुलगा" अशी लोकांची भावना,हे सर्व पाहण्याजोगतं असतं.....
मित्रांनो, मी तुम्हाला आता माझ्या जिवनातील एक अमूल्य घटना सांगणार आहे, आशा करतो की हा लेख वाचल्यावर तुमच्या मनातील भावनासुद्धा जागृत होतील....
मे 20, 2014 रोजी माझ्या जिवलग मित्राच्या बहिणीचे लग्न होते.... ती जरी त्याची सख्खी बहिण असली तरीही भाऊ म्हणून ती मलाच जास्त इज्जत देत होती..... त्याच लग्नात मी आदल्या दिवशी लग्नाची कामे करत असताना,62 किलो चा गंज मला उचलायचा होता.... पण आधीच अंगात जोर नव्हता आणि बहिण आता घर सोडून जाणार म्हणून मनस्थिती सुद्धा ख़राब झालेली होती....मी गंज उचलन्यासाठी मुलांना बोलवायला बाहेर आलो, तेव्हढ्यातच भाऊंचे आगमन झाले.....
सुमारे 60-60 किलो वजनाची दोन मुले,तरुण, धष्टपुष्ट, वय 23 वर्षे, उंची जवळपास 174 सेमी, म्हणजेच साधारणतः 5 फुट 7 इंच..... आणि त्या दोघानीं एकेका हातानेच तो कडी नसलेला गंज पकडून ट्रक्टरवर ठेवला,ते दृश्य बघून माझ्या डोळ्यातील नसांत रक्त गोठले आणि माझ्या डोक्यात विचारांची खळबळ माजली. .. सुमारे 10:30 वाजता संगीतमय हळदिच्या कार्यक्रमात ते दोघे नाचत होते. मी त्यांना आजवर कधी पाहिलेच नव्हते... हळदिचा कार्यक्रम संपताच मी माझ्या मित्राला विचारले की ,
"कोण आहेत रे हे दोन महाबली?"
"एक माझ्या मावशीचा मुलगा आहे, आणि दूसरा मोठेबाबांचा... " त्याने थोडक्यात परीचय करून दिला...
मी म्हंटला, "काय काम करतात हे ?"
तर तो म्हणाला, "दोघेही आर्मीत आहेत....."
ते त्याचे उद्गार ऐकून मी समजलो की, सामान्य व्यक्ती तो बिनकड्यांचा गंज उचलुच शकत नव्हते......
दुसर्या दिवशी लग्नात गेलो असता, दोघेही सोबत होते आणि ज्याप्रमाणे लोफर मुले मुलींना पाहतात त्याचप्रमाणे ते सुद्धा लग्नाचा आनंद घेत होते....
मला त्यांच्याशी बोलायचं होतं पण आर्मी वाले म्हणजे खडूयाळ डोक्याचे असतील म्हणून मी तेव्हा काहीच बोलल्लो नाही...
लग्न झाले असता दोघेही माझ्या बाजूने जेवणासाठी पंगतीत बसले.... तेव्हा मी ठरवलं आता ह्यांना काहीतरी विचारावंच..... .
मी म्हंटले, "नमस्कार दादा,ऐकलंय की तुम्ही आर्मीत आहात...."
दोघेही,"हो....."
मी,"कुठे आणि ड्यूटी कसली आहे?"
पहिला,"मी जनरल ड्यूटी,आसामला...."दूसरा,"आणि मी स्पेशल फोर्सेस,दिल्लीला....."
मी, "दादा,भीती नाही वाटत का तुम्हाला.....?"
दोघेही,"कसली भीती रे?"
"आपल्याच देशात कशाला कुणाच्या बापाला घाबरायचं.....?"
तेव्हा माझी आर्मी जॉइन करण्याची इच्छा प्रबळ झाली....
मी,"दादा,मला पण आर्मी जॉइन करायची आहे...."
पहिला,"अरे कर न मग...! चांगली तयारी कर, हालत बनव, उंची वाढव, आर्मीत इज्जत तर भेटतेच भेटते, पैसाही भरपूर आणि कसलं टेंशनही नाही..."
दूसरा, "फक्त लागल्यावर पस्तावू नको,म्हणजे झालं, नाहीतर म्हणशील ह्या दोघांनीच मला फसवलं....."
पहिला, "आणि फक्त ट्रेनिंग व्यवस्थित कम्पलीट करशील.. .!"
तेवढे बोलून जेवण संपले.... मी आनंदाच्या भरात नाव्हून गेलो.... त्या दोघांनी बाहर मला छाती फुगवायला लावली, मी छाती फुगवून दाखवली असता त्यांनी "वेरी गुड" म्हंटलं..... आणि मी आनंदाने भारावून गेलो... तिसर्या दिवशी ते दोघेही ड्यूटी वर जाण्यासाठी निघाले.... जात असताना आई-वडिलांकडे पाहून त्यांच्या डोळ्यांतील अश्रूंचा पाझर माझ्या हृदयात कल्लोळ माजवून गेला.....
जाताना माझ्याकडे बघून "येतो रे नेक्स्ट जनरेशन आर्मी....." असं म्हणुन, ते मला त्यांचा नंबर देवून निघून गेले...... ते त्यांचे सुमधुर बोल ऐकून माझ्या हृदयातील रक्त डोक्यात गेले आणि भावना जागृत झाल्या.....
आता माझे एकच लक्ष होते, ते म्हणजे आर्मीत भरती व्हायचे..... वडिलांना सांगितले असता त्यांनीही मला प्रोत्साहनच दिले.. .
मित्रांनो,शेवटी एवढंच सांगायचंय की मुलींमागे का फ़िरता?
प्रेम करायचंच आहे तर देशावर करा,
मुली स्वतः तुमच्या मागे फिरतील....

म्हणून भावना जागृत करा आणि सैनिक बना.....
जय हिंद......

© प्रफुल इंगळे

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014




"लोकशाहीची झाली दैना
पैशाविना कुणी मतच देईना"

देशाच्या राज्यकारभाराची एक उत्तम पद्दती म्हणून लोकशाही शासन पद्धतीचा उल्लेख केला जातो..... जगातील बहुतेक देशांना लोकशाही शासन पद्धतीचे आकर्षण असल्याचे दिसते..... लोकशाही व्यतिरीक्त अन्य शासन पद्धती असणार्या देशातील जनतेने संघटीतपणे संघर्ष करुन लोकशाही अस्तित्वात आणली.....

पण आता चित्र बदलत चालले आहे, लोकशाहीला भ्रष्टाचाराचे ग्रहन लागले आहे..... राजकारण म्हंटले की पैसाकारण आले.....लाखो रुपयाच्या उलाढाली नेते करतात, निवडूण आल्यावर स्वतहाचे खिशे भरतात; ही सामान्य संकल्पना च होत चालली आहे......

प्रत्येक पक्ष असो वा नेता हा एखाद्या थोर पुरुषांचा आढावा घेउन जनतेसमोर येतो व त्यांचे पराक्रम व थोरवी सांगुन राजकारण करतात....या समाजात राजकारणी लोकांनी निवडणुकीची वेगळीच व्याख्या तयार केली. "लोकशाही नसुन धर्मशाही मतदानाचे स्वरुप निर्माण केले".... एवढेच नव्हे तर महात्म्यांना देखील राजकारणात ओढले..... ज्या महात्म्यांच्या नावावर हे राजकारण करतात तसे ते जरा तरी वागतात का? फक्त मते ओढण्यासाठी त्यांचा वापर करतात..... कारण या लोकांचा राजकारण हा धंदा झाला, त्यांना राजकारणाची नशा लागली आहे.... ही माणसं समाजसेवा करुच शकत नाही.....

प्रत्येक थोर पुरुषाने फक्त मानवी समाजासाठी कार्य केले, ना कुठल्याही विशिष्ट समाजासाठी.....
लोकशाही हे लोकांचे शासन असते.... हे न म्हणता आपण असं ही म्हणु शकतो की, लोकशाही हे पैशावाल्या पुढार्यांचे शासन असते.....

विचारात्मक द्रुष्टीने राजकारण समजणे शक्य होईल, जेव्हा प्रयत्न तळाला पोहोचतील.... तेव्हा देशाला आभाळासारखे आकार मिळणार व सर्वकाही ओघात सामावून घेणार, प्रगतीचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर येणार......

© विपुल वर्धे.....

**वर्ष पहिले, अंक पहिला**
**26 जुन 2014**

मनापासून मनापर्यंत

# समीक्षा

© विशाल इंगळे

मृगजळ म्हंटलं कि सर्वात आधी तुमच्या नजरेसमोर काय येतं? वाळवंटात दूर कुठे तरी पाणी असल्याचा होणारा भास, कि दुर समुद्रात चारही दिशांनी फक्त पाणीच पाणी असलेल्या बेटावर अडकल्यावर होणारा बोटिचा भास......? सांगायचं असं मृगजळ म्हणजे नसलेल्या गोष्टिंचं अस्तित्व.....

मृगजळ म्हंटलं कि माझ्या नजरेसमोर येते ती सुनिल डोईफोडेंची मृगजळ..... कुटुंब, मैत्री, प्रेम अश्या सर्वच नात्यांना एका सुत्रात गुंफणारी कादंबरी..... सुनिल डोईफोडेंनी ज्या अप्रतमरीत्या कादंबरीचं लिखाण केलं आहे त्याबद्दल बोलायला शब्द अपुरे पडतील.....

एक वेळा तुम्हि वाचायला सुरुवात केली कि ती पुर्ण वाचुन होईपर्यंत मनाला चैनच पडत नाहि..... कादंबरी तुम्हाला अस्वस्थ करत राहते..... शब्दरचना, आणि परिस्थितीचं समर्पकरीत्या केलेलं वर्णन; कादंबरीचं प्रत्येक पात्र आणि परिस्थितीचं चित्र तुमच्या नजरेसमोर निर्माण करते.....


मृगजळ एक सायकोलाॅजिकल थ्रिलर कादंबरी आहे..... सत्य घटनेवर आधारीत..... पुर्ण कादंबरी वाचली कि "समटाईम्स रियालिटी इझ मोअर ड्रामाटिक दॅन फिक्शन" ही टॅगलाइन सार्थक झाल्यासारखी वाटायला लागते.....

कादंबरी मुळ मराठित असली तरी, गिरिष खत्री आणि मुग्धा आपटे यांनी ईंग्लिश मध्ये अनुवादित केलेली "illusion" तुम्हि वाचू शकता, या शिवाय हिंदीतही हि कादंबरी अनुवादित झालेली आहे...... मुख्य म्हणजे तुम्ही अॅन्ड्राॅईड अॅप म्हणून सुद्धा कादंबरी डाऊनलोड करुन वाचू शकता..... म्रुगजळ हि सत्य घटनेवर आधारलेली एका कुटुंबाची न संपणार्या रहस्याची कथा......

कादंबरी केंद्रित आहे ती म्हणजे मुख्य पात्र असणार्या विजय वर.... जो शेवटी हॅलोसीनेशन या मानसिक आजाराला बळी पडतो...... तो नशीब आणि परिस्थितीला झुंज देत राहतो..... हि कादंबरी आहे दैवाच्या हातातील खेळणं झालेल्या पात्रांची.....

कादंबरीची सुरुवात होते राकेशच्या रिसेप्शन पार्टी पासून..... सर्वच मित्रमंडळी रीयुनियन पार्टी असल्याप्रमाणे पार्टीचा आनंद घेत असतात...... सर्व वाट बघत होते ती म्हणजे राकेशचे जिवलग मित्र असणार्या विजय आणि प्रियाची....... प्रियाचं आगमन आधी होतं, ती विजयला भेटायला आतूर असते..... नंतर आई आणि मोठ्या बहिणीसोबत विजय प्रवेश करतो..... आणि सर्व प्रिया वर कमेंट करायला सुरुवात करतात...... सर्वांना वाटायचं विजय आणि प्रिया एकमेकांच्या प्रेमात असावेत...... विजयला पण प्रियाला काहितरी सांगायचे होते.... प्रिया तिच्या मैत्रिणीसोबत असते तर तो पण आपल्या मित्रांच्या घोळक्यात अडकलेला असतो.... पण संधी साधून आणि मित्रांच्या नजरा चुकवून विजय प्रियाला एकटे गाठतोच..... ते दोघेही खुप दिवसांनंतर समोरा समोर भेटत असतात...... काहितरी महत्वाचं सांगायचंय म्हणून तो प्रियाला दुसर्या दिवशी भेटायला बोलावतो.... त्याच्या आवाजातून त्याची उत्सुकता व्यक्त होत होती..... सर्व पार्टीचा आनंद घेत असताना अचानक झालेल्या शालीनीच्या किंकाळीने वातावरण बदलते..... विजयची बहिण शालीनी हि मानसिक आजाराची शिकार असते..... तिच्या या आजारामुळे विजयचं पुर्ण कुटुंब चिंतित असतं..... दिवसेंदिवस आजार वाढतच जात असतो..... आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने विजयचे वडिल चांगल्या डाॅक्टर कडुन औषधोपचार करवून घेवू शकत नव्हते, आणि या चिंतेने ते नशेच्या आहारी गेले होते...... आता विजय हाच त्यांच्या कुटुंबाची शेवटची आशा असतो...... विजयची मानसिक परिस्थिती व्यक्त करण्यासाठी लेखकाने केलेली शब्दरचना उल्लेखणीय आहे...... या अनपेक्षित घटनेमुळे पार्टी येथेच संपते.......

नंतरचा दिवस प्रियाच्या आयुष्यातला बेस्ट दिवस ठरणार होता...... एवढ्या कालावधीनंतर शेवटी आज तो नक्की तिला प्रोपोज करेल ,अश्या स्वप्नांच्या जाळ्यात प्रिया अडकली होती.... आपल्या आयुष्यातील सर्वात




**पुस्तक : मृगजळ**

**लेखक : सुनिल डोईफोडे**

**प्रकार : कादंबरी**

**संकेतस्थळ :**

**www.marathinovels.net**

**वर्ष पहिले, अंक पहिला**
**26 जुन 2014**






जवळच्या व्यक्तीकडुन ते महत्वाचे तीन शब्द एकण्याकरीता, वेळेच्या 1 तास आधीच ती अशोक पार्क मध्ये येते..... आज तिचं स्वप्न सत्यात उतरणार होतं...... विजय येतो, पण नयना बद्दल आपल्या प्रेमाची कबुली दिल्यावर प्रियाच्या स्वप्नांचं घरटं वाहुन जातं...... तो नयना च्या प्रेमात पडतो.....नयना त्याच्या बास ची मुलगी असते आणि त्याची मदतनीस पण...... त्याच्या शब्दांतून त्याच्या नयनाबद्दलच्या प्रेमाची जाणीव ती करु शकत होती..... ती हे सत्य स्विकारते...... आणि विजयपासून शक्य तेवढ्या दुरच राहण्याचा प्रयत्न करते.... कादंबरी तुम्हाला भुतकाळात घेउन जाते...... विजय ,प्रिया आणि राकेशच्या महाविद्यालयीन दिवसांत....... विजय आणि राकेश खुप चांगले मित्र असतात आणि प्रिया त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेते..... हळुहळु ते चांगले मित्र बनतात, त्यांची मैत्री फुलायला लागते...... विजय आणि राकेशच्या घरची परिस्थिती अभ्यासासाठि अनुकूल नसल्यामुळे ते तिघे प्रियाच्या घरी ग्रुप स्टडी करत..... विजय आणि प्रिया अभ्यासात खुप हुशार असतात पण राकेश तितकासा हुशार नसतो...... HSC चा रिसल्ट तिघांच्या मैत्रीत दुरावा घेउन येतो..... निकाल कमी लागल्यामुळे राकेश प्रिया आणि विजयला दुर्लक्षित करायला लागतो...... विजय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतो तर प्रिया वैद्यकीय...... पण या अंतराने त्यांच्या नात्यात दुरावा निर्माण होत नाही...... थोड्या प्रमाणात का असो पण ते एकमेकांच्या टच मध्ये राहतात....... HSC च्या रिसल्ट मुळे राकेश आणि विजय मध्ये मात्र थोडा दुरावा निर्माण होतो, पण नंतर लवकरच त्यांच्यातील गैरसमज दुर होतो.....

नयनाबद्दल माहित पडल्यावर प्रिया विजय पासून दुर राहण्याचा प्रयत्न करते...... विजयच्या आधी आपलं प्रेम व्यक्त न करण्याचं ती ठरवते..... पण दैवाला काही वेगळंच मान्य असतं...... प्रियाला विजयला नोकरीवरुन काढुन टाकल्याची बातमी कळते, आणि ती त्याला भेटायला जाते...... विजय कडुन तिला कळतं कि तो आॅफिसच्या पार्टीत सर्वांसमोर नयनाबद्दलच्या प्रेमाची कबुली देतो आणि दुसर्याच दिवशी त्याच्या हातात टर्मिनेशन लेटर येतं..... प्रिया थोडी गोंधळते, तिला सर्व सत्य स्पष्टपणे जाणून घ्यायचं असतं...... ती नयनाला भेटते आणि तिची बाजू ऐकूण घेते..... नयना सांत्वनापुर्वक आपलं विजयवर कधी ही प्रेम नसल्याचं स्पष्ट करते....... येथून कथा वळण घेते, विजय पण आपल्या बहिणीसारखाच हॅलोसीनेशन आजाराचा बळी झालाय हे प्रियाच्या लक्षात येतं...... विजयचा मानसिक आजार दिवसेंदिवस वाढतच असतो, सोबतच तो चिडचिडा व्हायला लागतो..... प्रिया आणि राकेश त्याच्या आईला ट्रिटमेंट साठि तयार करायला लावतात.... ट्रिटमेंट मुळे विजय बरा व्हायला लागतो....... प्रिया मुळे त्याला नविन जाॅब मिळतो...... आणि त्यानिमित्तच 15 दिवसांकरीता बाहेर जाण्याची संधीही मिळते...... काहि ठरलेल्या कामांमुळे प्रिया विजयच्या सोबत जाऊ शकत नाही....... विजय परत आल्यावर त्याला घरात नयना दिसते, तो तिच्यावर ओरडतो..... पण नयना तिथे नसतेच..... त्याला कसंतरी शांत करुन त्याची आई त्याला ट्रिप बद्दल विचारते...... " मी गेल्यावर .. दोन दिवसाने मागून प्रिया तिथे आली म्हणून बरं झालं... नाहीतर खुप बोअर झालं असतं" विजय उत्तर देतो...... आणि विजयच्या आईला धक्काच बसला...... कारण विजयच्या जाण्यानंतर दुसर्याच दिवशी प्रियाचा अक्सीडेंट झालेला असतो...... आणि तेव्हापासून ती कोमात असते..... त्याला हे सत्य पटावं म्हणून त्याची आई त्याला प्रियाच्या घरी नेते.... विजयचं औषधांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे तो पुन्हा मानसिक आजाराचा शिकार होत होता...... या सर्व घटनांक्रमात होणारी त्याच्या आईची मानसिक अवस्था अतिशय दयनीय आहे...... पण तिची सहनशक्ती आणि विजयबद्दलचं असणार्या प्रेमापोटी ती खचून जात नाही..... ती तो पुन्हा बरा व्हावा म्हणून प्रयत्न करते..... विजयला कळतं की प्रिया चांगली व्हावी म्हणून तिला आजीच्या गावी पाठवण्यात आलं आहे...... विजय तिथे जाण्याचं ठरवतो...... त्याच्या आईची ईच्छा असूनही घरच्या जबाबदार्यांमुळे ती त्याच्यासोबत जाऊ शकत नाही..... 4 दिवस होऊनही विजय परत आलेला नसतो, शेवटी त्याच्या कुटुंबाला त्याची डेडबाॅडी मिळते..... विजयच्या मृत्युनंतर प्रिया वडिलांचं घर सोडून देते आणि विजयच्या कुटुंबासोबत राहायला लागते..... ती शेवटच्या श्वासापर्यंत विजयच्या कुटुंबाचा सांभाळ करायची जबाबदारी स्विकारते...... पण स्टोरी इथेच संपत नाही, प्रिया पण आता मानसिक आजाराची शिकार व्हायला लागली होती...... तिला विजयच्या परत येण्याचा भास होतो..... पण प्रत्यक्षात मात्र तिथे कोणीच नसतं..... विजयची आई प्रियाच्या मागे घराबाहेर पडते, जमीनीवर तिला दोन सावल्या पडलेल्या दिसतात, एक प्रियाची आणि एक विजयची...... पण प्रत्यक्षात मात्र तिथे तिनच सावल्या असतात, एक प्रियाची,एक विजयच्या आईची आणि एक त्याच्या बहिणीची......

अतिशय सुंदरपणे लेखकाने प्रत्येक परिस्थिती वाचकांसमोर आणली आहे...... पहिल्यांदा वाचताना माझ्या डोळ्यांत पाणी आलं होतं..... शेक्सपिअरचा वारसा लाभलेल्या सुनिल डोईफोडेंचं लेखण अवर्णनीय आहे.....
तुम्ही पण ही कादंबरी मोफत वाचू शकता.......
www.marathinovels.net या संकेतस्थळावर......

**© विशाल इंगळे**

**संदर्भ :**

1) **www.the-criterion.com**
2) **www.marathinovels.net**

रानपिंगळा

© विशाल इंगळे

# रानपिंगळा

रानपिंगळा या विषयावर मुद्दामच लिहितोय...... दोन वर्षांआधी रानपिंगळा आणि त्याचा अभ्यास या दोनही विषयांशी माझा दूर दूर पर्यंत संबंध नव्हता...... नेचर फोटोग्राफी हा वाचना व्यतिरिक्त माझा आवडता छंद.... आमच्या विद्यापीठातर्फे असाच फोटोग्राफी चा छंद असनार्‍या मुलांसाठी मुद्दाम काही पर्यावरण प्रेमी शिक्षकांनी व्यवसायाभिमुख विषय म्हणून इको-टूरिज्म एंड वाइल्डलाइफ फोटोग्राफी हा जोड अभ्यासक्रम मंजूर करवून घेतला होता..... आमच्या महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाचे डॉ.गजानन वाघ या अभ्यासक्रमाची सर्व जबाबदारी सांभाळत होते..... मी आणि आशिष, आम्हाला या अभ्यासक्रमाबद्दल कळलं आणि आम्ही वाघ सरांची भेट घेतली..... खरं सांगायचं झालं तर संगणकशास्त्राचे विद्यार्थी आणि नेचर रिलेटेड कोर्स? त्यांना धक्का बसला की काय कोण जाने, पण नक्की कोर्स करायचाय ना? असं दोन तीन वेळा विचारून झाल्यावरच आम्हाला एडमिशन फॉर्म देण्यात आला.....

वाघ सर अतिशय मोकळ्या स्वभावाचे होते..... काही गोष्टी अगदी व्यवस्थित समजाव्यात म्हणून ते वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करत.....

जानेवारी 2013 मध्ये शहरात 26 वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात आले होते, आणि याचे आयोजक होते "वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था"...... वाघ सर या संस्थेशी रिलेटेड असल्याने आम्हाला वालंटियर म्हणून या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली..... या संमेलनाचं मुख्य वैशिष्ट होतं, "सातपुड्याचं वैभव : रानपिंगळा".....

अनेक मान्यवर या पक्ष्याबद्दल बरंच काही बोलले..... पण माझं लक्ष आकर्षित झालं ते मानद वन्यजीव रक्षक व "वाइल्डलाइफ एंड नेचर कंझर्वेशन सोसाइटी" चे सचिव डॉ. जयंत वडतकर यांच्या प्रेझेंटेशन ने..... डॉ.जयंत वडतकर हे बर्‍याच वर्षांपासून या पक्ष्यावर संशोधन करतायेत.....

त्या दिवसानंतर रानपिंगळा हा माझ्या अभ्यासाचा विषय बनला....

या लेखात नोंदविलेली माहिती माझ्या एनवायरनमेंट प्रोजेक्ट साठी तयार केलेल्या संकलनातील काही अंश आहे.....

आज मेळघाटातील सर्वांत महत्त्वाचा व प्रसिद्ध असा पक्षी म्हणजे रानपिंगळा.....

शुभ्र पोट, ठिपकेरहित डोके व पाठ असे रूप असलेल्या रानपिंगळ्याला आदिवासी बोलीत डुडा नावाने संबोधले जाते तर संस्कृतात तो खर्गला आणि मराठीत रानपिंगळा म्हणून ही ओळखला जातो......

या पक्षाचं शास्त्रीय नाव Athene blewitti (अथेनी ब्लुइटी) आणि इंग्लिश नाव Forest Owlet (फॉरेस्ट औलेट) असं आहे......



येल विद्यापीठ आणि झूलॉजिकल सोसायटी ऑफ लंडन या संस्थांनी जगभरातील सर्व पक्ष्यांचा अभ्यास करून प्रसिद्ध केलेल्या नामशेष होण्याचा सर्वाधिक धोका असलेल्या शंभर पक्ष्यांच्या यादीत महाराष्ट्रातील सहा पक्ष्यांचा नामनिर्देश करण्यात आलेल असून, पहिल्या दहा पक्ष्यांमध्ये रानपिंगळ्याचा समावेश आहे......

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी अर्थात बीएनएचएसने रानपिंगळा हा राज्यपक्षी करावा अशी मागणी केली होती.....रानपिंगळा हा पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे आणि या पक्षाचं संवर्धन व्हावं असा या मागचा उद्देश होता..... पण वन्यजीव सल्लागार मंडळासोबत झालेल्या बैठकीत हरियाल हाच राज्यपक्षी ठेवण्याचा निर्णय राज्य शासनातर्फे घेण्यात आला.....

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

मनापासून मनापर्यंत




मेळघाटातील पक्षिवैभव सातत्याने विकसित होत आहे आणि नव्या दुर्मिळ पक्ष्यांची त्यात वाढ होत आहे.... मेळघाट प्रदेशामध्ये पक्ष्यांच्या नोंदी व अभ्यासाचे काम सर्वप्रथम २0व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटिश अधिकाऱ्यांद्वारे केले गेले. त्या वेळी मेळघाटामध्ये त्यांनी २४0 जातींचे पक्षी नोंदविले होते.

आज नव्याने झालेल्या काही पक्ष्यांच्या नोंदीमुळे मेळघाटाची पक्षी सूची २९२ पर्यंत पोहोचली आहे.

१९९७ मध्ये भारतातील नष्ट झालेल्या चार पक्ष्यांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेला रानपिंगळा (Forest Owlet) या पक्ष्याचा नंदूरबार जिल्ह्यातील तळोद्याच्या जंगलात पुनर्शोध लागला आणि भारतातील नामशेष झालेल्या पक्ष्यांपैकी एक पक्षी पुन्हा सापडला.....

पहिल्यांदा इ.स. १८७२ मध्ये त्याचा शोध लागल्यापासूनच तो कायम चर्चेत राहिला. एफ.आर. ब्लेविट या शास्त्रज्ञानं १८७२मध्ये फुलझन (मध्य प्रदेश)मधून या पक्ष्याचे काही गोळा केलेले नमुने अभ्यासून पुढच्या वर्षीच प्रसिद्ध पक्षी शास्त्रज्ञ ए.ओ. ह्यू यांनी त्याचं वर्गीकरण केलं आणि हा पक्षी वेगळा असल्याचं संशोधन मांडलं. त्यानंतर त्या पक्ष्याचं शास्त्रज्ञाच्या नावानंच म्हणजे ऍथिनी ब्लेविटी असं नामकरण झालं. १८७७ ला या पक्ष्याचा अधिक अभ्यास करण्यात आला. त्यावेळी हा पक्षी सरईपल्ली ते गोमर्धा, उंदती अभयारण्य, रायपूर ते बसना रोड (आताचे) आढळून आला. फेब्रुवारी १८७७ ला व्हॅलेंटाईन बेल या अभ्यासकानं खारियार-संबलपूर (ओरिसा) नंदूरबार, तळोदा, खान्देश (सातपुडा,महाराष्ट्र) आणि रायपूर (मध्य प्रदेश) याठिकाणाहून या पक्ष्यांचे एकूण ५ नमुने गोळा केलेत. हे सर्व नमुने आजही इंग्लंडच्या ब्रिटिश म्युझियममध्ये जतन करून ठेवल्या गेलेत.....

२० व्या शतकाच्या सरत्या काळात अमेरिकन पक्षी शास्त्रज्ञांच्या एका समुहानं मात्र हा पक्षी अजून या पृथ्वीतलावर जिवंत असेल अशी आशा ठेवून त्याला शोधण्याचं आव्हान स्वीकारलं. ब्रिटिश म्युझियममधून १०० पेक्षा जास्त वर्षांपूर्वी गोळा केलेल्या नमुन्याच्या दिसण्यावरून आणि त्यांच्या सापडण्याच्या ठिकाणाच्या नोंदीवरून पामेला रासमुसेन, बेनकिंग आणि डेव्हिड अबॉट यांच्या संशोधन चमूनं आपली मोहीम आखली आणि १९९७ ला भारतात येऊन गुजरातच्या पश्चिमेकडच्या टोकापासून मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सातपुडा पर्वत रांगेत शोध मोहिमेस प्रारंभ केला, अन् अगदी लवकरच म्हणजे २७ नोव्हेंबर १९९७ ला या चमूस नंदूरबार जवळच्या तळोद्याच्या जंगलात हा पक्षी पुन्हा सापडला.

तब्बल ११३ वर्षानंतर रानपिंगळ्याचा पुनर्शोध लागला ही बातमी जगभर पसरली आणि रानपिंगळा पुन्हा चर्चेत आला. हा पक्षी सातपुड्यामध्ये साधारणत: समुद्रसपाटीपासून ३५० ते १००० मीटर उंचीवर सापडतो. रानपिंगळा हा आकारानं साधारणत: २३ सेंमी म्हणजेच सामान्य ठिपकेवाल्या पिंगळ्याच्या आकाराचा असून रंगानं करडा विटकरी आणि पोटावरची पिसं पांढ-या रंगाची असतात. पंखांवर ठिपकेवाल्या पिंगळ्याप्रमाणचे पांढरे ठिपके असले तरी त्याच्या डोक्यावरील बारीक भूवई आणि मानेखाली बारीकशी पांढरी कॉलर याचं वेगळेपण दर्शविते. याचा आवाज ठिपकेवाल्या पिंगळ्याप्रमाणं कर्कश नसून कोकिळेप्रमाणं कुहू असा गोड आहे. याशिवाय तो आणखी काही वेगळे आवाजसुद्धा काढतो. रानपिंगळ्याचं खाद्य हे सामान्य पिंगळा ह्या छोट्या घुबडाप्रमाणंच उंदीर, सरडे, पाली, कीटक असं असून हा झाडाच्या ढोलीमध्ये घरटे करून राहतो. आत्तापर्यंतच्या अभ्यासावरून सध्या जगभरात फक्त सातपुडा म्हणजेच महाराष्ट्रातल्या हा पक्षी सापडत असून आता त्याची ओळख सातपुडा प्रदेशनिष्ठ (एन्डेमिक टू सातपुडा) व संपण्याचा ज्वलंत धोका (Critically Endengered) असणारा पक्षी अशी झाली असून या प्रजातीचे फक्त ५० ते १०० इतकेच पक्षी आज अस्तित्वात असावेत

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014




मनापासून मनापर्यंत


असं मानलं जातं..... त्यामुळेच या पक्ष्याचा समावेश दुर्मिळ पक्ष्याच्या यादीमध्ये वरच्या स्थानी केला गेला आहे....

हा पक्षी आज मेळघाटामध्ये ६0पेक्षा जास्त संख्येने आढळून आला आहे..... पिंगळा गटातील अन्य पक्ष्यांप्रमाणे फक्त रात्रीच संचार करीत नाही तर दिवसाही संचार करतो. त्यामुळे तो शिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात पकडला व मारला गेला असण्याची शक्यता आहे. सध्याच्या काळात संकुचित होत चाललेली जगंलं, या पक्ष्याच्या अधिवासामध्ये होणारी वृक्षतोड, शेतीसाठी केलं जाणारं अतिक्रमण, वन तसंच परिसरातल्या शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक औषधं इत्यादीमुळे ही हा पक्षी आणि त्यांचे अधिवास धोकादायक झालेले आहेत....

ठराविक अधिवासातच याचं अस्तित्व असल्यामुळे हे अधिवास जर आज आपण वाचवून ठेवू शकलो नाही तर ११३ वर्षांनंतर पुनर्शोध लागलेला एक महत्त्वपूर्ण आणि दुर्मिळ पक्षी पुन्हा या पृथ्वीतलावरून लुप्त होण्यास वेळ लागणार नाही......







संदर्भ :

1) http://mr.m.wikipedia.org/wiki/रानपिंगळा

2) http://news1.marathisrushti.com/articles/printarticle.php?article=1101950 (- डॉ. जयंत वडतकर)

3) http://www.saamana.com/2014/April/27/Link/Utsav10.htm (- दा. कृ. सोमण)

4) http://abpmajha.abplive.in/mumbai/2011/06/28/article207443.ece/हरियाल-यापुढेही-राज्यपक्षी (- जयवंत पाटिल)

5) http://www.ranvata.in/node/547

(- डॉ. जयंत वडतकर)

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

Voice of the Hearts...

© विशाल इंगळे

मनापासून मनापर्यंत




श्रेया घोषाल...... संगीत क्षेत्रातील एक विख्यात नाव..... गायन किंवा संगीत वेड्या लोकांनी जर श्रेयाचं नाव ऐकलं नसेल तर नवलंच...... माझ्या स्वतहाबद्दल च सांगायचं झालं तर श्रेया हि माझी सर्वांत आवडती सिंगर...... लता दिदिंनंतर त्यांच्या सारखीच शैली असणारी एकमेव गायिका म्हणजे श्रेया......! श्रेया चा आवाज सरळ ह्रुदयाला स्पर्श करुन जातो...... आज अंक प्रकाशित करताना मुद्दाम सांगावसं वाटतं आणि अतिशय आनंद हि होतोय, 26 जुन हा युनायटेड स्टेट ओफ ओहिओ तर्फे दरवर्षी संपुर्ण जगात "श्रेया घोषाल डे" म्हणुन साजरा केला जातो..... आज आपल्या आवडत्या गायिकेबद्दल या अंकात लिहिण्याची संधी मिळाली हि माझ्यासाठि अतिशय अभिमानाची गोष्ट आहे......

श्रेया घोषाल ही हिंदी चित्रपटसृष्टीतील एक आघाडीची पार्श्वगायिका आहे. हिंदी (715 गाणी) सोबतच तिने तेलुगू (183 गाणी) , कन्नड (159 गाणी) , तमिळ (127 गाणी) , बंगाली (120 गाणी) , मल्याळम (47 गाणी), आसामी, गुजराती, मराठी, नेपाली, ओरीया, आणि पंजाबी इत्यादी प्रादेशिक भाषांमधूनही पार्श्वगायन केले आहे.

श्रेयाच्या कारकिर्दीची सुरुवात झाली ती "सा रे ग म प" ही दूरदर्शनवरील गाण्याची स्पर्धा जिंकल्यानंतर..... देवदास या हिंदी चित्रपटातून तिने पार्श्वगायिका म्हणून पदार्पण केले. या चित्रपटातील गायनासाठी तिला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, सर्वात्कृष्टपार्श्वगायिकेसाठीचा फिल्मफेअर पुरस्कार तसेच फिल्मफेयर आर.डी. बर्मन संगीत क्षेत्रातील नवकलाकार पुरस्कार मिळाले. तेंव्हापासून तिने सुमारे २०० चित्रपटांमध्ये गाणी म्हटली आहेत ज्यासाठी तिला एकूण ४ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार , ५ फिल्मफेयर पुरस्कार व ७ दक्षिणेमधील फिल्मफेअर पुरस्कार मिळाले आहेत. मिळाले. तेंव्हापासून तिने सुमारे २००चित्रपटांमध्ये गाणी म्हटली आहेत

"I do
not have a problem with what I feel are bad
lyrics. But I cannot sing double-meaning
songs and worse."
- Shreya Ghoshal

जन्म : १२ मार्च , १९८४ (वय: ३०)
जन्म स्थान : बहरामपूर, पश्चिम बंगाल
व्यवसाय : पार्श्वगायिका
गायन शैली : फिल्मी, हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीत, ग़ज़ल
वाद्ययंत्र : वोकल्स
सक्रिय : वर्ष 1998–वर्तमान
रिकॉर्ड लेबल : Sagarika
वेबसाईट : www.shreyaghoshal.com

गौरव पुरस्कार:
राष्ट्रीय पुरस्कार (२००३, २००६, २००८, २००९)
फिल्मफेअर पुरस्कार (२००३, २००५, २००६, २००७, २००८, २०१०, २०११, २०१२)

**वर्ष पहिले, अंक पहिला**

**26 जुन 2014**

# Voice of the Hearts...

© विशाल इंगळे

म ना पा सू न म ना प र्यं त



श्रेया मार्च १२, १९८४ रोजी बहरामपूर येथील बंगाली ब्राह्मण कुटुंबात जन्ली. ती रावतभाटा या राजस्थानातील छोट्या गावात वाढली. तिचे वडील बिश्वजीत घोषाल हे भारतीय आण्विक ऊर्जा महामंडळात प्रकल्प अभियंता म्हणून काम करतात आणि आईने साहित्यात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. चार वर्षांची असल्यापासून श्रेयाने आईला पेटीवर साथ देण्यास सुरुवात केली. तिने हिंदूस्थानी संगीताचे प्रशिक्षण कोट्यातील महेशचंद्र शर्मा यांच्याकडून घेतले. तिने खास लहान मुलांसाठी असलेली सा रे ग म प ही झी टीव्हीवरील स्पर्धा जिंकली. या स्पर्धेत परीक्षक म्हणून असलेल्या कल्याणजी यांनी तिच्या पालकांना मुंबईत येण्याबद्दल सांगितले. मुंबईत कल्याणजी यांच्याकडे १८ महिने अभिजात संगीताचे प्रशिक्षण घेतले व नंतर मुक्ता भिडे यांच्याकडे ते सुरू ठेवले. ती आण्विक ऊर्जा केंद्रीय विद्यालय, रावतभाटा आणि आण्विक ऊर्जा केंद्रीय विद्यालय, अणुशक्तिनगर (मुंबई) या शाळांत शिकली. शाळेनंतर एसआयईएस कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश घेतला. श्रेया सद्ध्या साहित्यात एम. ए. करण्याची तयारी करतेय.....

चित्रपट निर्देशक संजय लीला भंसालीचं लक्ष श्रेयाकडे खेचल्या गेलं जेव्हा तिने "सा रे गा मा पा" मध्ये दुसऱ्यांदा भाग घेतला...... या वेळेस तिची स्पर्धा होती व्ययस्क गायकांसोबत......

वर्ष 2000 मध्ये, त्यांनी आपल्या देवदास चित्रपटातील मुख्य महिला पात्र पारो साठि आवाज देण्याच्या संधीचा प्रस्ताव मांडला.....चित्रपटात श्रेया नी इस्माइल दरबार च्या संगीत निर्देशनात पाच गाणी गायलीत..... जगभरातुन चित्रपट दर्शकांनी एश्वर्या राय वर चित्रित झालेली, श्रेया ची गाणी एकलीत..... आणि लवकरच बॉलीवुड मध्ये अलका याज्ञिक, सुनिधि चौहान, साधना सरगम और कविता कृष्णमूर्ति सोबत एक आघाडिची पार्श्वगायिका बनली.....

देवदास नंतर, ए. आर. रहमान , अनु मलिक , हिमेश रेशमिया , मणि शर्मा, एम. एम. किरावनी, नदीम-श्रवण , शंकर-एहसान-लॉयल , प्रीतम , विशाल-शेखर , हंसलेखा, मनो मूर्ति, गुरुकिरण, इल्लया राजा , युवन शंकर राजा आणि हैरीज जयराज सोबतच अनेक संगीत निर्देशकांच्या निर्देशनात अनेक अभिनेत्रिंसाठि गात आहे......

उत्तर और दक्षिण फिल्म चित्रपट सृष्टितील योगदानासाठि श्रेया अनेक पुरस्कारांची मानकरी ठरलीय.....अमूल स्टार वॉयज ऑफ इंडिया छोटे उस्ताद संगीत कार्यक्रमात ती निर्णायकाच्या रूपात आली.... . तिने अनेक भारतीय टीवी धारावाहिकांसाठी शीर्षक गीते पण गायलीत......

श्रेयाच्या आवाजात एक जादु आहे.... ती रोमंटिक गाणी ज्या अप्रतिमपणे, आणि सुंदरतेने गाते, प्रशंसनीय आहे..... याचंच एक उदाहरण म्हणजे जिस्म चित्रपटातील "जादू हैं नशा हैं"....

2007 मद्ध्ये गायलेल्या गाण्यांबद्दल ती ला सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिकेचा आइफा (IIFA) पुरस्कार मिळाला, 2008 मद्ध्ये तीचं नाव पाच पैकी चार नामांकनात आलं...... 2009 मद्ध्ये सर्वश्रेष्ठ गायिकेचा फ़िल्मफ़ेयर पुरस्कार आणि सिंग इज किंग मद्ध्ये प्रीतमच्या `तेरी ओर' साठि आइफा (IIFA) पुरस्कार मिळाला..... श्रेया हिंदी चित्रपटातील एकमेव अशी गायिका आहे, जी 25 वर्षांच्या वयातच तीन राष्ट्रीय पुरस्कारांची मानकरी ठरली....

2013 मध्ये, अरजित सिंग, ए.आर.रेहमान,आतीफ असलम आणि मोहित चौहान सारख्या दिग्गजांच्या लागोपाठ "सावन" वर ची सर्वांत आवडती कलाकार बनली...... फोर्ब्स च्या विख्यात 100 सिलिब्रिटिंच्या यादित श्रेयाच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे......

श्रेयाचा आवाज हा बऱ्याच पैकि लता दिदिंच्या आवाजाशी मेळ खातो..... आणि श्रेया लता दिदिंना नेहमीच आपल्या आदर्श मानते..... प्रसिद्ध गायक जावेद अली, पलक मुछ्छल चित्रपटसृष्टितील आपल्या सर्वात आवडत्या गायिका म्हणुन श्रेयाचं नाव घेतात....

## पुरस्कार व मान्यता :

नॅशनल फिल्म अवॉर्ड्स :
2002: नॅशनल फिल्म अवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबॅक सिंगर - बैरी पिया (देवदास )
2006: नॅशनल फिल्म अवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबॅक सिंगर - धीरे जलना (पहेली )
2007: नॅशनल फिल्म अवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबॅक सिंगर - ये इश्क है (जब वी मेट )

आइफा (IIFA) अवॉर्ड्स :
2003: आइफा (IIFA) बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड—डोला रे (देवदास)
2004: आइफा (IIFA) बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड - जादू है नशा है (जिस्म)
2008: आइफा (IIFA) बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड- बरसो रे (गुरु)
2009: आइफा (IIFA) बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड - तेरी ओर (सिंह इस किंग)




फ़िल्मफ़ेयर अवॉर्ड्स :
2003: फ़िल्मफेयर आर॰ डी॰ बर्मन अवॉर्ड फॉर न्यु म्यूज़िक टैलेंट
2003: फ़िल्मफ़ेयर बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड- डोला रे (देवदास )
2004: फ़िल्मफ़ेयर बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड - जादू है नशा है (जिस्म )
2008: फ़िल्मफ़ेयर बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड - बरसो रे ( गुरु )
2009: फ़िल्मफ़ेयर बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड - तेरी ओर ( सिंह इस किंग)
फ़िल्मफ़ेयर अवॉर्ड्स साउथ
2007: फ़िल्मफ़ेयर बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड (तमिल) - मुन्बे वा (सीलुनु ओरु काढाल)
2008 : फ़िल्मफ़ेयर बेस्ट फिमेल प्लेबैक अवॉर्ड (कनाडा) - निंना नोदालेंतू - ( मुस्सनजेमातु )

ज़ी सिने अवॉर्ड्स :
2003: ज़ी सिने अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक सिंगर (कविता कृष्णमूर्ति के साथ साझा) - डोला रे (देवदास)
2006: ज़ी सिने अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक सिंगर - पियु बोले (परिनीता )
2008: ज़ी सिने अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक सिंगर बरसो रे (गुरु)

संदर्भ :
1) http://en.wikipedia.org/wiki/Shreya_Ghoshal
2) www.shreyaghoshal.com

स्टार स्क्रीन अवॉर्ड्स :
2004: स्टार स्क्रीन अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक - जादू है नशा है (जिस्म)
2006: स्टार स्क्रीन अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक - पियु बोले (परिनीता)
2008: स्टार स्क्रीन अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक - बरसो रे (गुरु)

इतर अवॉर्ड्स :
2005: आंध्र प्रदेश स्टेट अवॉर्ड बेस्ट फिमेल प्लेबैक सिंगर - पिल्लागाली अल्लारी (अथाडू ) और नीके नुवु (मोदाती सिनेमा ) (तेलगु )
2007: तमिलनाडु स्टेट फिल्म अवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबैक - मुन्बे वा (सिल्लुनु ओरु काढाल) (तामिल )
2008: अप्सरा अवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबैक सिंगर - बरसो रे (गुरु)
2009: अप्सरा अवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबैक सिंगर - तेरी ओर (सिंह इस किंग)
2008: GPBA - जर्मन पब्लिक बॉलीवुड अवॉर्ड बेस्ट सिंगर (फिमेल) - ये इश्क हाय ( जब वी मेट)
2008: ज़ी अस्तित्व अवॉर्ड फॉर एक्सीलेंस इन म्यूजिक
2010: अस्परा अवॉर्ड बेस्ट फीमेल प्लेबैक सिंगर - तुझ में रब दिखता है (रब ने बना दी जोड़ी)

वर्ष पहिले, अंक पहिला
26 जुन 2014

मनापासून मनापर्यंत

जुन आणि साहित्य

# “मनापासून मनापर्यंत”

वर्ष पहिले, अंक पहिला

जुन 1

मृत्यु

१९३४ - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर , नाटककार आणि विनोदी लेखक .

१९९८ - गो.नी. दांडेकर , मराठी कादंबरीकार

जुन 2

जन्म

१९०७ - विष्णू विनायक बोकील , मराठी नाटककार, लेखक .

जुन 4

मृत्यु

१९१८ - गोविंद वासुदेव कानिटकर, मराठी साहित्यिक

जुन 5

मृत्यु

१९८७ - ग. ह. खरे , भारतीय इतिहासतज्ञ.

जुन 6

जन्म

१८९१ - मारुती वेंकटेश अय्यंगार, कन्नड कवी, कथाकार कादंबरीकार

१९०९ - गणेश रंगो भिडे , अभिनव मराठी ज्ञानकोशकार

मृत्यु

२००२ - शांता शेळके , मराठी कवियत्री.

जुन 7

मृत्यु

१९९२ - डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक

जुन 11

मृत्यू

१९५० - पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ साने गुरूजी, बालसाहित्यिक, समाजवादी नेता आणि स्वातंत्र्य सैनिक

जुन12

जन्म

१८९४ - पुरुषोत्तम विश्वनाथ बापट, पाली भाषा कोविद; बौद्ध धर्म ग्रंथांचे भाषांतरकार आणि संपादक.

मृत्यू

१९६४ - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, मराठी भाषेचे गाढे अभ्यासक.

१९७८ - गुओ मोरुओ, चिनी भाषेमधील कवी, लेखक, इतिहासकार.

२००० - पु. ल. देशपांडे , मराठी मनावर दीर्घ काळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे लेखक, कवी, नाटककार, अभिनेता (चित्रपट, रंगभूमी), दिग्दर्शक, निर्माता, संगीतकार.

२००१ - शकुंतला बोरगावकर , विनोदी लेखिका






जुन13

मृत्यू

१९६९ - प्रल्हाद केशव अत्रे, मराठी लेखक , पत्रकार, संपादक, राजकारणी, शिक्षणतज्ञ, नाटककार, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथालेखक व प्रभावी वक्ते.

जुन 15

जन्म

१९३३ - सरोजिनी वैद्य , मराठी लेखिका, समीक्षिका.

जुन 17

मृत्यु

१८९५ - गोपाळ गणेश आगरकर , समाजसुधारक, विचारवंत.

जुन 18

जन्म

१५५२ - गॅब्रियेलो चियाब्रेरा, इटालियन कवी.

१८१२ - इव्हान गॉन्चारोव्ह , रशियन लेखक .

मृत्यू

१९०१ - रामचंद्र भिकाजी गुंजीकर, विविध ज्ञानविस्तार या मासिकाचे संपादक.

१९९९ - श्रीपाद रामकृष्ण काळे, मराठी साहित्यिक

जुन 19

जन्म

१९४७ - सलमान रश्दी , ब्रिटीश लेखक

जुन 20

मृत्यु

१९९७ - वासुदेव वामन पाटणकर ऊर्फ भाऊसाहेब पाटणकर, मराठीतील प्रथम शायर

जुन 21

जन्म

१९०५ - ज्यॉ-पॉल सार्त्र , फ्रेंच लेखक व तत्त्वज्ञानी.

मृत्यु

१९२३ - सदानंद रेगे , मराठी कवी, कथाकार आणि अनुवादक

१५२७ - निकोलो माकियाव्हेली , इटलीचा राजकारणी, इतिहासकार.

१९२८ - नाथमाधव तथा द्वारकानाथ माधव पितळे, मराठी कादंबरीकार

जुन 22

जन्म

१९०८ - डॉ. विष्णू भिकाजी कोलते, महानुभाव साहित्य संशोधक.

जुन 24

जन्म

१९२७ - कवियरासू कन्नडासन, तमिळ लेखक .

जुन 25

जन्म

१९०३ - जॉर्ज ऑरवेल, इंग्लिश लेखक .

मी कधीही आत्मचरित्र लिहिणार नाही. लिहिण्यासारखं खूप आहे. काही काही प्रसंग तर इतके नाट्यपुर्ण आहेत की त्या प्रसंगासाठी काहीतरी आत्मनिवेदनपर लिहावं, पण तरीही, आत्मचरित्र वगैरे काही खरं नाहि. आत्मचरित्र का लिहिलं जात असावं? आपण किती बेस्ट आहोत आणि तमाम पब्लिकला ते शेवटपर्यंत कसं कळलं नाहि, हा टाहो फोडण्यासाठी आत्मचरीत्र लिहिलं जातं. आपल्याला काय काय सहन करावं लागलं हे सांगण्याचाही हेतु असतोच. माझ्या हातून कळत-नकळत असंच काहितरी लिहिलं जाईल. म्हणून आत्मचरित्र नहिं मंगता है! आपण ज्याप्रमाणे काहि लोकांचे अपराध पोटात घालतो, त्याप्रमाणे आपले अनेक अपराध इतर मंडळी पोटात घालत असतात. त्या इतरांनी चरित्र लिहायचं ठरवलं तर आपले तीन तेरा वाजतील. म्हणूनच जोपर्यंत इतर मंडळी आपापली आत्मचरित्र लिहित नाहीत, तोपर्यंत मी माझं आत्मचरित्र का लिहावं?

- व.पु.काळे ( वपुर्झा )

**जुन 26**

**जन्म**

**१६८१ - हेडविग सोफिया , स्वीडिश लेखक.**

**१८३८ - बंकिमचंद्र चटर्जी , आद्य बंगाली कादंबरीकार.**

**मृत्यु**

**२००१ - वसंत पुरुषोत्तम काळे, मराठी साहित्यिक**

**जुन 29**

**जन्म**

**१८७१ - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर , मराठी नाटककार, विनोदकार, व वाङ्मय समीक्षक.**

**मृत्यु**

**१८७३ - मायकेल मधुसूदन दत्त , बंगाली कवी**

**२००० - कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर , मराठी ऐतिहासीक कादंबरीकार.**

---

संदर्भ :

http://en.wikipedia.org




www.gdmanapasunmanaparyant.blogspot.in

# “मनापासून मनापर्यंत”

**वर्ष पहिले, अंक पहिला**

"मनापासून मनापर्यंत"च्या पुर्ण टिम तर्फे आपले खूप खूप आभार .....

जेमतेम 7-8 जन मिळुन तयार झालेली हि आमची छोटिशी टीम..... या टिम मध्ये कुणीही प्रोफेशनली लेखक किंवा कवी वगैरे नाही..... तुमच्या सारख्याच बर्र्याच वाचकांपैकि आम्हि पण काहि लोक.....

राहुल, विक्की आणि मी (विशाल), आम्ही अतिशय जिवलग मित्र..... जेवढ्या दिवसांचं आमचं आयुष्य, तेवढ्याच दिवसांची आमची मैत्री..... आणि आमची टिम GD......

आम्हि म्हणजे फार चिल्लर लोकं..... आयुष्याच्या रस्त्यावर चालता चालता आमच्या सारखेच काहि सोबती मिळाले....... आणि हि चिल्लर संख्या वाढत गेली...... टिम च्या प्रत्येक व्यक्तिची स्वतहाची एक विशेष शैली आहे...... आणि त्यामुळेच आम्हि सर्व एकत्र बांधल्या गेलो.....

साहित्याशी सगळ्यांचं नातं तसं फार दुरचंच,कधी कधी ओठांवर येणारे शब्द कागदावर उतरवायचे..... आणि आपापसांत एकमेकांना ऐकवायचे..... तेवढ्याच दोन चार लोकांकडुन मग थोडि प्रशंसा करवुन घ्यायची आणि नंतर साल्यांकडुनच इज्जतीचे धिंदवडे काढुन घ्यायचे..... तेवढ्यातच आम्हि समाधानी......

इंटरनेटच्या जाळ्यावर ई-साहित्याच्या नव्या जगाची ओळख झाली...... काहि दिवसांअगोदर मी टिम समोर ई-मॅगझिन ची संकल्पना मांडली......सर्वांनी अपेक्षित प्रतिसाद दिला आणि "मनापासून मनापर्यंत...." या आमच्या पहिल्या वहिल्या ई-मॅगझिन निमित्त ई-साहित्याच्या या क्षेत्रात आम्हि पाउल टाकलं......

"मनापासून मनापर्यंत...." बद्दल सांगायचं म्हणजे हिंदी-मराठि साहित्याची एक छोटिशी संकलिका....... विशेष आमच्या सारख्याच साहित्य प्रेमी लोकांसाठि, मुख्यत: युवा वर्गासाठि.....!

"मनापासून मनापर्यंत...." या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाबद्दल जवळपास सर्वच मी अंकातील मनोगतात लिहिलंय, विक्किने पण संपादकीय लेखात मी विसरलेल्या बर्र्याच गोष्टी लिहिल्यात....

आमच्या सारख्याच कधी कधी लिहिणार्र्या सर्व चिल्लर लोकांचं "मनापासून मनापर्यंत....." मध्ये मनापासुन स्वागत..... आपल्या मनात चालणारी चुळबूळ कागदावर उतरवा..... आणि आमच्या पर्यन्त पाठवा...... आम्ही ती पोहोचवू.......

## मनापासून मनापर्यंत.....!

**- विशाल इंगळे ( सह-संपादक )**